# महाराष्ट्र विधानसभा
## चौथे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ / पौष ६, १९४४ ( शके )**

## मुख्यमंत्री :- यांचे प्रभारी विभाग

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

### सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उप प्रादेशिक कार्यालयांतर्गत वाहनांचे रजिस्ट्रेशन रद्द करुनही वाहने विनापरवाना फिरत असल्याबाबत

**(१) * ५०१३५ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उप प्रादेशिक कार्यालयांतर्गत सन २०१८ ते सन २०२२ या कालावधीत झालेल्या कर गैरव्यवहारात १०० हून अधिक वाहनांची नोंदणी रद्द करण्यात येऊनही सदर वाहने आजही रस्त्यावर विनापरवाना फिरत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाहनांपैकी काही वाहनांची विमा नोंदणी, रजिस्ट्रेशन ते आरसी बुक मिळेपर्यंतची प्रक्रिया ही गैरमार्गाने व बेकायदेशीररित्या होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने संबंधित वाहन चालकांवर तसेच उप प्रादेशिक कार्यालयातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सिंधुदुर्ग येथे सन २०१७ ते २०२० या कालावधीत शुल्क व कराचा भरणा न करता एकूण ११६ वाहनांची अनियमित नोंदणी झालेली असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.
(३) अनियमित नोंदणी झालेली वाहने संगणक प्रणालीवर ब्लॅकलिस्ट करण्यात आलेली आहेत. सदर प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे..
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उल्हासनगर (जि.ठाणे) शहराला अतिरिक्त पाणी पुरवठा वाढवून मिळण्याबाबत

**(२) * ५४६९८ श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहराला ५० द.ल.लि. पाणी पुरवठा वाढवून द्यावा अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री महोदय आणि संबंधित विभाग यांच्याकडे दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कमी पाणी पुरवठ्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेने स्वतंत्र स्त्रोत्र निर्माण केल्यामुळे बचत होणारे ५० द.ल.लि. पाणी प्रतिदिन उल्हासनगर महानगरपालिकेला आरक्षित करण्यास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, असे असतानाही वाढीव पाणी आरक्षणाबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि जलसंपदा विभाग यांच्यात करारनामा न झाल्यामुळे उल्हासनगर शहराकरीता घेण्यात येणाऱ्या पाण्यासाठी दीडपट दंडात्मक दर आकारण्यात येत आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प नं. ४ व ५ मध्ये एम.आय.डी.सी. च्या पाले जलजोडणीवरुन प्रतिदिन ४८ द.ल.लि. इतका पाणी पुरवठा अपेक्षित असतांना प्रतिदिन केवळ ३८ द.ल.लि. इतका पाणी पुरवठा होतो. त्यामुळे कॅम्प नं. ४ व ५ मधील काही भागात दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

उल्हासनगर हे विस्थापित शहर असल्याने तेथील वितरण व्यवस्था जुनी झाली असून, जुन्या वितरण व्यवस्थेत गळतीचे प्रमाण जास्त आहे. त्याचप्रमाणे बिगर घरगुती ग्राहक वगळता घरगुती ग्राहकांना विना जलमापक ठोक स्वरुपात पाणी देयके आकारण्यात येत असल्याने, पाण्याचा वापर अनियंत्रित आहे. त्यामुळे पाणी टंचाई निर्माण होते, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) उल्हासनगर शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता तत्कालीन महापौर व आयुक्त यांनी मागणी केल्यानुसार, मा.मंत्री (जलसंपदा) (कृ.खो.वि.म. वगळून) व मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचेकडे दिनांक १७.०५.२००५ रोजी झालेल्या बैठकीत, नवी मुंबई महानगरपालिकेने स्वतंत्र स्त्रोत निर्माण केल्यामुळे बचत होणारे ५० MLD पाणी प्रतिदिन उल्हासनगर महानगरपालिकेला आरक्षित करण्यास मान्यता देण्यात आली आहे, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) मूळ मंजूर १२० द.ल.लि. पाणी आरक्षणापेक्षा २० द.ल.ली. इतका अतिरिक्त पाणी पुरवठा उल्हासनगर महानगरपालिकेस होत असल्याने, सदर अतिरिक्त पाणी पुरवठ्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत उल्हासनगर महानगरपालिकेस दिडपट दंडाची आकारणी करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी मा. मंत्री (उद्योग व उर्जा) यांचेकडे दिनांक ३०.०९.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत पाणी पुरवठ्याची मासिक देयके रु. ८/- प्रति १००० लीटर प्रमाणे अदा करण्याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेस मौखिक निर्देश देण्यात आलेले आहेत व त्याप्रमाणे माहे जून, २०२२ पासूनची देयके अदा करण्यात येत आहेत, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ शहरात अमृत योजनेत बनावट कागदपत्रे सादर करुन केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३) * ५२११३ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ शहराला पाणीपुरवठा करणारी ३०० कोटी रुपयांच्या अमृत योजनेत मोठा गैरव्यवहार झाला असून या योजनेतील ३३ केव्ही एक्सप्रेस फिडरचे काम मिळविण्यासाठी कंत्राटदाराने बनावट कागदपत्रे सादर केली असल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात कंत्राटदारांवर गुन्हा नोंदविण्याचे मा.जिल्हा न्यायालयाने आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अमृत अभियानंतर्गत यवतमाळ पाणीपुरवठा योजनेकरीता मुख्य जलकेंद्र बेंबळा व जलशुध्दीकरण केंद्र टाकळी येथील पंपींग मशिनरी करीता ३३ KV एक्सप्रेस फिडरची उभारणीसाठी प्रसिद्ध केलेल्या निविदेतील पुर्व अर्हतेच्या अटींच्या अधीन राहुन तीन निविदा पात्र ठरल्या होत्या. त्यापैकी मे.कोमल इलेक्ट्रिकल सर्विसेस यवतमाळ, व मे.मोरया इलेक्ट्रिकल, पुसद यांनी सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र बनावट व चुकीचे असल्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे तक्रार प्राप्त झाली होती.

सदर निविदाधारकांनी सादर केलेले प्रमाणपत्र हे महावितरण कंपनीचे असल्याने त्यांच्याकडून याबाबत शहानिशा करण्यात आली असून महावितरणाने सदर अनुभव प्रमाणपत्रे योग्य असल्याचे स्पष्ट केले महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यवतमाळ यांनी कळविले आहे.

(२) व (३) आर्थिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर केलेल्या पत्रानुसार मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय यवतमाळ यांच्या आदेशान्वये सदर प्रकरणी गुन्हा नोंद केला असून आर्थिक गुन्हे शाखा यवतमाळ यांचेमार्फत याबाबतचा तपास सुरु असल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) शहराला पाणी पुरवठा करणारी खडखड नळपाणी पुरवठा योजना अपूर्ण असल्याबाबत

**(४) * ५४६६७ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) शहराला चार दशलक्ष घनमीटर प्रतिदिन पिण्याचा पाणी पुरवठा करण्यासाठी मंजूर झालेली खडखड नळपाणी पुरवठा योजना अद्यापही अपुर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत धरणातून पाण्याचा उपसा करणे तसेच शुद्धीकरणासाठी लागणारी सौर ऊर्जा प्रणालीसाठी जागेची अडचण इत्यादी कारणांमुळे योजना कार्यान्वित न झाल्यामुळे पाणी पुरवठ्याचा गंभीर प्रश्न त्या भागात निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदर योजना तात्काळ पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत जव्हार नगरपरिषदेच्या ३.५ दशलक्ष लिटर प्रति दिन क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्र असलेली पाणीपुरवठा योजना मंजूर असून सदर योजेनेचे काम सद्यस्थितीत प्रगतीपथावर आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रकल्पातील पाण्याचा उपसा करणे तसेच शुद्धीकरणास व सौर ऊर्जा उपांगांची जागेची अडचण दूर केली असून सदर जागा कंत्राटदारास उपलब्ध करून दिलेली आहे.

(३) व (४) सदर प्रकल्पाच्या कंत्राटदारास आतापर्यंत पाच वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मार्च, २०२३ अखेर सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबतच्या सूचना मुख्याधिकारी जव्हार नगरपरिषद यांना दिलेल्या आहेत. सदर काम मार्च, २०२३ अखेर पुर्ण न झाल्यास कंत्राटदारास यापुढे विना दंडात्मक मुदतवाढ देण्यात येऊ नये अशा सूचना दिलेल्या आहेत.

-----------------

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा परीक्षा**
**सन २०१९ मध्ये निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देणेबाबत**

**(५) * ५१५७८ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या ‘‘स्थापत्य अभियांत्रिकी ‘‘सेवा परीक्षेत सन २०१९ मध्ये निवड झालेल्या तसेच कागदपत्र, चारित्र्य व वैद्यकीय पडताळणी झालेल्या ११४३ उमेदवारांना शासनाकडून अद्यापही नियुक्त्या दिल्या नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवड झालेल्या उमेदवारांनी सदरहू नियुक्त्या तातडीने होण्याकरिता मुंबईच्या आझाद मैदानावर साखळी उपोषण सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा परीक्षा २०१९ मधील जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, मृद व जलसंधारण विभागांच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांपैकी मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेवून EWS (आर्थिकदृष्टया दुर्बल घटक) व्यतिरिक्त एकूण १०३२ उमेदवारांना दि.१.१२.२०२२ रोजी नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पारोळा (जि.जळगाव) येथील जलसंधारणाच्या कामातील गैरव्यवहाराबाबत**

**(६) * ५०५४१ श्री.अजित पवार (बारामती), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा (जि.जळगाव) येथील उपविभागामध्ये जलसंधारणाच्या कामामध्ये कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या अधिकाऱ्यांनी सर्वेक्षणाच्या नावाखाली मजूर संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या नावे बनावट देयके अदा केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अभियंत्यांनी जिल्हा नियोजन समितीमार्फत वाढीव बनावट देयके मंजूर करुन घेतली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्थानी लेखी तक्रारी करुनही विभागाने अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, जलसंधारण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त पदभार एका अधिकाऱ्याकडून काढून एकाच दिवसात पुन्हा त्याच अधिकाऱ्याकडे देण्यात आला, हे ही खरे आहे काय
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने त्वरीत चौकशी करुन दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे. पारोळा, जि.जळगांव येथील उपविभागामध्ये जलसंधारणाच्या कामामध्ये कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याची तक्रार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जळगाव तसेच समान विषयाची तक्रार जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडेही प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगाव यांनी कार्यकारी अभियंता तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली होती.

जिल्हाधिकारी, जळगाव यांनी चौकशी समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालाची शासन स्तरावरून छानणी करून उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही. मृद व जलसंधारण उपविभाग, पारोळा अंतर्गत कार्यक्षेत्रात येणाऱ्या सन्माननीय आमदारांनी मागणी केलेल्या कामांची संख्या व कार्यक्षेत्राची व्याप्ती जास्त असल्याकारणाने तसेच उपविभागाकडे तांत्रिक मनुष्यबळ कमी असल्यामुळे सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने शासनाच्या प्रचलित पध्दतीने व नियमानुसार मजूर संस्था व सुशिक्षीत बेरोजगार अभियंते या बाह्य यंत्रणांना निविदेद्वारे कामे देवून सर्वेक्षणाचे व अन्वेषणाचे काम करून घेण्यात आले आहे. संबंधित कामाची तपासणी करून संबंधित अधिकाऱ्यांनी रितसर देयके अदा केली आहेत.

(३) साठवण बंधारा फाफोरे बु. व साठवण प्र.ऊ. पिंप्रि या कामावर अनुक्रमे रुपये १४.५८/- लक्ष व रुपये ५.५९/- लक्ष इतका कार्यालयीन खर्चाच्या बाबींवरील निधी देयकांमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या शासनास प्राप्त अहवालात प्रशासकीय मान्यतेमध्ये या दोन्ही बाबी समाविष्ठ नसल्यामुळे अनियमितता केली आहे असे नमूद आहे. तथापि उक्त दोन्ही कामांची देयके प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादितच देण्यात आली आहेत.

(४) स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक संस्थाच्या प्राप्त लेखी तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा जलसंधारण अधिकारी, जळगाव यांनी दि.१२.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, जळगाव यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. सदर चौकशीचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) अंशतः खरे आहे. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद या पदाचा अतिरिक्त कार्यभार अपर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता संवर्गातील अपर आयुक्त जलसंधारण, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, औरंगाबाद यांच्याकडे दि. २९.०७.२०२२ रोजीच्या आदेशान्वये सोपविण्यात आला होता. तद्नंतर शासन आदेश दि.०५.०८.२०२२ अन्वये त्यांच्याकडील व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार काढून अपर आयुक्त जलसंधारण, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे यांच्याकडे पूर्ववत करण्यात आला आहे.

(६) व (७) जिल्हाधिकारी, जळगाव कार्यालयाच्या दि.२८.०९.२०२२ रोजीच्या शासनास प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने छानती करून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## पालघर नगरपरिषदेच्या मालमत्ता पुनर्मुल्यांकनाचा व घरपट्टी आकारणीबाबतचा बेकायदा ठेका काळ्या यादीत टाकलेल्या ठेकेदाराला देण्यात आल्याबाबत

**(७) * ५२९४४ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर नगरपरिषदेच्या मालमत्ता पुनर्मुल्यांकन व घरपट्टी आकारणीबाबतचे कंत्राट अमरावती महानगरपालिकेने काळ्या यादीत टाकलेल्या व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली नसलेल्या ठेकेदाराला बेकायदेशीररित्या दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाचे लेखापरिक्षण करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबतची मागणी नगरपालिकेच्या नगरसेवक यांनी स्थानिक निधी लेखा परिक्षण विभागाचे सहाय्यक संचालक यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.

(२) अशा आशयाची मागणी स्थानिक नगरसेवकांनी केली आहे, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणाची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, पालघर यांना देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.पुणे) तालुक्यातील पाझर तलावाच्या बांधकामाबाबत

**(८) * ५४६६० श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील चऱ्होली खुर्द, मेदनकरवाडी, म्हाळुंगे येथील पाणीटंचाई निवारणाकरीता तीन पाझर तलावांसाठी शासनाने कोट्यवधी रुपयांचा खर्च केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी आळंदी लगतच्या चऱ्होली खुर्द येथे पाझर तलाव पूर्ण करण्यासाठी त्यावेळी सुमारे ८९ लाख रुपये खर्चाच्या रितसर निविदा प्रक्रिया राबवून निविदांना मान्यता देऊन मंजुरीप्रमाणे कंत्राटदाराला संपूर्ण देयक अदा करण्यात आल्यानंतर देखील पाझर तलाव बांधण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गट क्र.३५५ ते ३५७ तसेच ३५९ ते ३६२ या क्षेत्रात प्रत्यक्षात संपादन केलेल्या जागेवर पाझर तलाव अस्तित्वात नसल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असता उपजिल्हाधिकारी, पुणे (भूसंपादन) यांनी प्रांताधिकारी, खेड यांना प्रत्यक्ष पाहणी करून १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय.

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

चऱ्होली खुर्द येथे दोन पाझर तलाव आहेत. त्यापैकी एक पाझर तलाव गट नं. ३५५ व ३५७ तसेच, ३५९ ते ३६२ एकुण क्षेत्र ५ हे. ३३ आर याठिकाणी प्रस्तावित करण्यात आला होता. या पाझर तलावाच्या भूसंपादनासाठी रक्कम रुपये ९४,२५९/- खर्च झालेला आहे. या पाझर तलावाच्या बांधकामासाठी काहीही खर्च झालेला नाही.

मौजे चऱ्होली खुर्द येथे आणखी एक पाझर तलाव बांधण्यात आला असुन सदर पाझर तलावाच्या बांधकामासाठी रक्कम रुपये ३,३५,०००/- खर्च झालेला आहे. मौजे चऱ्होली खुर्द येथे दोन्ही पाझर तलावासाठी एकुण रुपये ४,२९,२५९/- खर्च झालेला आहे.

पाझर तलाव म्हाळुंगे या कामावर एकुण रक्कम रुपये २,९७,२९५/- खर्च झाला आहे.

वरीलप्रमाणे चऱ्होली खुर्द येथील दोन व म्हाळुंगे येथील एक अशा तीन पाझर तलावांवर एकूण रक्कम रुपये ७,२६,५५४/- एवढा खर्च झालेला आहे.

मेदनकरवाडीमध्ये एकही पाझर तलाव अस्तित्वात नाही.

(२) हे खरे नाही.

मौजे चऱ्होली खुर्द येथील जमीन गट नं. ३५५ व ३५७ तसेच ३५९ ते ३६२ क्षेत्र ५ हे. ३३ आर या भूसंपादित जमिनीवर पाझर तलाव अद्याप बांधण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर पाझर तलावाच्या बांधकामासाठी रुपये ८९.०० लक्ष खर्च झालेला नाही. सदर पाझर तलावाच्या भूसंपादनासाठी रुपये ९४,२५९/- खर्च झालेला आहे.

मौजे चऱ्होली खुर्द येथील वरील गट नं. शिवाय गट नं. २३३, २३५ ते २३७, २३९, ४९९ व ५०० येथील जमिनीवर एक पाझर तलाव बांधण्यात आलेला असून त्यासाठी रक्कम रुपये ३,३५,०००/- खर्च झालेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) उपविभागीय अधिकारी (प्रांत), खेड यांचे अहवालानुसार मौजे चऱ्होली खु. ता. खेड येथील जमीन गट नं. ३५५/२, गट नं. ३५७/२, गट नं. ३५९/२, गट नं. ३६०, गट नं. ३६१/२, गट नं. ३६२/२ मधील एकुण क्षेत्र ५ हेक्टर ३३ आर जमीन संपादित झालेली असली तरी सदर संपादित जागेवर खर्च झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्याबाबत**

**(९) * ४९६०० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव-पाथर्डी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रियेतील सर्व फेऱ्या संपल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्था स्तरावर प्रवेश घेणाऱ्या विविध जातीच्या आरक्षणपात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती इत्यादी योजनांचा लाभ नाकारला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने परिपत्रक जाहीर करून संस्था स्तरावर होणाऱ्या प्रवेशाचे अर्ज शिष्यवृतीसाठी पाठविण्यात येवू नये असे आदेश निर्गमित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संस्था स्तरावर रिक्त असलेल्या जागांवर प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती नाकारल्यामुळे त्यांना पुर्ण शुल्क भरुन शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व इतर योजनांचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशंत: खरे आहे

केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत खाजगी विनाअनुदानीत व कायम विना अनुदानित महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांमध्ये सर्व प्रवेशित असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जात आहे.

केंद्र शासनाच्या उपरोक्त योजनेव्यतिरिक्त राज्य शासनाची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ राज्यातील केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारेच (कॅप राउंड) प्रवेशीत विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे,

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाची राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या धर्तीवर करण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच सामाजिक न्याय विभाग यांनी सदर योजनेच्या अंमलबजावणी बाबत दि. ३१ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित केले आहे. तसेच यामध्ये लाभ अनुज्ञेय असण्यास्तव संस्थास्तरावरील प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करुन पाठविण्यात येवू नये असे तंत्र शिक्षण संचालनालयाने दि.१५.३.२०२१, दि.१०.८.२०२१, व दि.१४.३.२०२२ च्या पत्रान्वये संबंधित विभागांना सूचित केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर (पुर्व) येथील भांडेवाडी डम्पिंग यार्ड बफर झोनपासून मुक्त करण्याबाबत

**(१०) * ५४६८६ श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (पुर्व) भांडेवाडी येथील डम्पिंगमुळे आजूबाजूला असलेल्या वस्त्यांमधील नागरिकांना त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वरिष्ठ वैधानिक समन्वयक, नीरी यांच्या मान्यतेने सदरहू ५०० मीटरचे अंतर ३०० मीटर करण्याचा निर्णय नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ (१) शासन अधिसूचना नगर विकास विभाग क्रमांक टिपीएस-२४९६/२६४३/प्र.क्र.३००(अ)/९७/नवि-९, दिनांक ७ जानेवारी, २००० अन्वये भागशः मंजुर झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिका ठराव क्रमांक २४७, दिनांक २ जुलै, २०१८ रोजी सर्वसाधारण सभेत एकमताने बफर झोन ३०० मीटर करण्याबाबत मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या डंपिंग यार्डला लागूनच नागरिकांची घरे असल्यामुळे बफर झोनचे अंतर पूर्णपणे समाप्त करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) शासन निर्णय क्र. टिपीएस- २४९६-२६४३-प्र.क्र.३०० (अ)-९७-नवि-९, दि.०७ जानेवारी, २००० अन्वये नागपूर शहराची सुधारीत विकास योजना भागशः मंजुर झाली असून ती दि.०१ मार्च, २००० पासुन अमंलात आली आहे.

शासन पत्र क्र. टिपीएस- १८१३/२९९/१३/नवि-१३, दि. १३.०१.२०१७ रोजी निर्देशीत केल्यानुसार भांडेवाडी डम्पिंग यार्डभोवती आवश्यक बफर झोन संदर्भात राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिक अनुसंधान संस्था (निरी) नागपूर यांचेकडुन अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुसार राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिक अनुसंधान संस्था (निरी) नागपूर यांनी दि.०५ जानेवारी, २०१८ रोजीच्या अहवालानुसार भांडेवाडी डम्पिंग यार्डपासुन सोडावयाचे सुरक्षित अंतर २७० ते ३०० मी. पर्यंत करण्याची शिफारस करण्यात आलेली होती. त्यानुषंगाने नागपूर महानगरपालिकेने सदर डम्पिंग यार्डपासुनचे सुरक्षित अंतर ३०० मी. करणेबाबत ठराव क्र. २४७, दि.०२.०७.२०१८ पारीत केलेला आहे.

सदरहु भांडेवाडी डम्पिंग यार्ड नागपूर सुधार प्रन्यासचे नियोजन प्राधिकरण क्षेत्रात येत असल्यामुळे नागपूर महानगरपालिकेने पारित केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्याकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नागपूर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार नागपूर सुधार प्रन्यासने ठराव क्र.१२/११८२/ २०.१०.२०१८/एस ई/प्लानिंग, पारित केलेला आहे.

(३) नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेव्दारा दिनांक ०२.०७.२०१८ रोजी ठराव क्र. २४७, अन्वये राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिक अनुसंधान संस्था (निरी) कडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने कंपोस्ट डेपोपासुन बफर झोन प्रस्तावित करावयाचे झाल्यास त्यानुसार Waste Processing Facility (Composting and RDF Facility) आणि भुमी भराव क्षेत्रासभोवताली Green Belt विकसीत केल्यास डम्पिंग यार्डपासुन बफर झोनचे अंतर ५०० मी. वरुन कमी करुन ३०० मी. करण्याबाबतचा ठराव पारित केला आहे.

(४) व (५) मा.श्री.कृष्णा खोपडे, विधानसभा सदस्य यांनी दि.२८.१०.२०२२ रोजीच्या पत्रानुसार नागपूर डम्पिंग यार्डपासुन बफर झोनची ३०० मी. ची मर्यादा पुर्णपणे समाप्त करणेबाबत शासनास पत्र दिलेले असुन सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने पत्र क्र. टिपीएस-२४२२/१९१०/२०२२/नवि-९, दि.१०.११.२०२२ अन्वये नागपूर महानगरपालिकेकडून अहवाल अपेक्षिलेला असून त्याअनुषंगाने नागपूर महानगरपालिकास्तरावर कार्यवाही सुरु आहे. नागपूर महानगरपालिकेने शासनास अहवाल सादर केल्यानंतर त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याची तजविज करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामांमध्ये झालेली अनियमितता

**(११) * ५४५४२ श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामांमध्ये गैरव्यवहार झालेल्या तक्रारींची बाब लोकायुक्त आणि विभागीय कृषी सहसंचालकांनी वेगवेगळ्या चौकशी मध्ये सिद्ध केली आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या चौकशीत दोषी ठरविण्यात आलेल्या कंत्राटदार आणि तत्कालीन अधिकारी कर्मचाऱ्यांकडून सुमारे ४ कोटी ४८ लाख ३४ हजार ५५५ वसूल करण्याचा गोपनीय अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास लोकायुक्तांनी पहिल्या टप्प्यात ३०७ कामांची तपासणी करून ४ कोटी ८३ हजार ३४६ रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा ठपका ठेवून बोगस कामे करणाऱ्या कंत्राटदारांविरोधात पोलिसात गुन्हा नोंदवून त्यांना काळ्या यादीत टाकले असून २९७ कंत्राटदार आणि ८३ अधिकारी कर्मचाऱ्यांकडून गैरव्यवहार झालेल्या रक्कमेच्या प्रस्तावित केलेल्या वसुलीला संबंधित कंत्राटदार व अधिकारी कर्मचारी प्रतिसाद देत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित अधिकारी कर्मचारी यांचेविरुद्ध विभागीय चौकशी व निलंबनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे. संचालक (मृद संधारण) व अधीक्षक कृषि अधिकारी (दक्षता पथक) यांनी संयुक्तपणे प्राथमिक चौकशी केली असून सदर प्रकरणी अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे. दक्षता पथकाने केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालानुसार रु.४,००,८३,३४७/- इतक्या रकमेची कामे कमी आढळून आली असून सदर रक्कम अधिकारी/कर्मचारी व ठेकेदार/ सहकारी संस्था/मजूर संस्था यांच्याकडून वसूलपात्र दर्शविण्यात आली आहे. त्यापैकी रु.४०,०७,०१३/- इतकी रक्कम १६ अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून वसूल झाली असून, ४ ठेकेदारांनी रु.१,४७,३४६/- इतकी रक्कम भरणा केली आहे. पहिल्या टप्प्यातील जबाबदार २४ अधिकारी/ कर्मचारी आणि १३८ ठेकदार यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन परळी वै. येथे अनुक्रमे दि.८/३/२०१८ व दि.२८/६/२०१८ रोजी एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे. तसेच एकूण १२९ ठेकेदारांना काळ्या यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.
(४) प्रस्तुत प्रकरणी जबाबदार असलेल्या २४ पैकी एकूण १७ अधिकारी/ कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले असून सदर २४ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द दि.३०/०८/२०१९ च्या ज्ञापनान्वये सामाईक विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आकुर्ली, कांदिवली (पुर्व) येथील महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा पोषण आहार दिल्याबाबत

**(१२) * ५२३८९ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आकुर्ली, कांदिवली (पुर्व) येथील हिंदी, मराठी, गुजराती व ऊर्दू या महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहाराअंतर्गत देण्यात येणाऱ्या खिचडीमध्ये अळया व काडया आढळून आल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शाळांमधील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त शाळांना पौष्टीक आहार पुरविण्याचे काम वात्सल्य महिला बचत गट करीत असुन, उक्त बचत गटामार्फत १३ डब्यांऐवजी प्रत्यक्षात फक्त ३ डब्बे पुरविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुसार महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना सकस पोषण आहार पुरविण्याबाबत तसेच अशा प्रकारांची पुनरावृत्ती टाळून दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) दिनांक १२.०९.२०२२ रोजी मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील मध्यान्ह भोजनात अळी आढळून आल्याबाबत संबंधित शाळेने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागास दिनांक २२.०९.२०२२ रोजी कळविले होते.

तसेच, आकुर्ली मनपा हिंदी शाळेत वितरीत करण्यात आलेल्या खिचडीमध्ये अळी व अगरबत्तीची काडी आढळून आल्याची बातमी दिनांक १९.०९.२०२२ रोजीच्या "दैनिक पुढारी" या स्थानिक वृत्तपत्रात प्रसारीत झालेली होती, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) आकुर्ली मनपा शालेय इमारतीमध्ये आहार पुरवठा करणाऱ्या संस्थेबाबत तक्रार प्राप्त होताच दिनांक ०१.१०.२०२२ पासून सदर संस्थेकडून आकुर्ली मनपा शालेय इमारतीमध्ये आहार पुरवठ्याचे काम काढून दुसऱ्या संस्थेस देण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत सदर शाळेमध्ये पौष्टिक व सकस आहार पुरवठा होत असून याबाबत कोणतीही तक्रार नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) सदर प्रकरणी आकुर्ली मनपा शालेय इमारतीमध्ये यापूर्वी पुरवठा करीत असलेल्या वात्सल्य महिला बचत गटाचे काम दिनांक ३०.०९.२०२२ रोजी बंद करण्यात आले असून, सदर कामाकरिता दिनांक ०१.११.२०२२ पासून ओम धनश्री महिला मंडळ या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच, सदर शाळेत वात्सल्य महिला बचत गटामार्फत निकृष्ट दर्जाचा आहार पुरवठा झाला आहे त्या दिवसांची विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेली आहार भत्त्याची रक्कम दंड स्वरुपात संबंधित संस्थेस आकारण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेतील शालेय पोषण आहार पुरविणाऱ्या दोषी संस्थांनाच पोषण आहार पुरवठ्याचे आदेश दिल्याबाबत

**(१३) * ५१८०१ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेतील शिक्षण विभागाने सेंट्रल किचन योजनेंतर्गत शालेय पोषण आहार पुरवठा करण्याचे आदेश १३ पैकी ९ संस्थांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संस्थांनी निकृष्ट दर्जाचा आहार पुरविल्याच्या अनेक तक्रारी नगरसेवकांकडून आल्यामुळे तत्कालीन आयुक्तांनी संबंधित १३ संस्थांच्या पोषण आहार पुरवठा कामाची तपासणी केली असता त्यात तथ्य आढळून आल्यानुसार संबंधित संस्थांचा ठेका रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रिया हाती घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही नवीन निविदा प्रक्रियेत पुन्हा त्याच संस्थांना आहार पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२), (३) व (४) नाशिक महानगरपालिकेने सन २०१९ मध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रिया राबवून महानगरपालिका क्षेत्रातील शाळांना केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीव्दारे तयार आहार पुरवठा करण्यासाठी १३ संस्थांची निवड केली होती.

सदर संस्थांबाबत तक्रार प्राप्त झाल्याने, चौकशीअंती उक्त १३ संस्थांनी अटी व शर्तींचा भंग केल्याने महानगरपालिकेने या १३ संस्थांचा करारनामा रद्द केला होता.

महानगरपालिकेच्या सदर निर्णयाविरुध्द उक्त १३ संस्थांपैकी ०७ संस्थांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली होती. यामध्ये दि.०५/०५/२०२२ रोजीच्या निर्णयान्वये मा.उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्या संस्थांना नवीन निविदेमध्ये भाग घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदर संस्थांमार्फत आहार पुरवठा करण्याचे मा.उच्च न्यायालयाचे निर्देश असल्याने, सदर संस्थांना सद्या शालेय पोषण आहार पुरवठा करण्याचे काम दिले आहे.

उर्वरित ०६ संस्थांपैकी ०२ संस्थांनी आहार पुरवठ्याचे काम स्विकारले. सद्यस्थितीत नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत १३ पैकी ०९ संस्था पोषण आहार पुरवठा करण्याचे काम करीत आहेत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयानुसार राबविण्यात आलेल्या नविन निविदा प्रक्रियेत एकूण ८५ निविदा महानगरपालिकेस प्राप्त झाल्या असून, त्यापैकी ३५ संस्था/महिला बचत गट पात्र झालेले आहेत. यामध्ये ०८ जुन्या संस्थांचा समावेश आहे.

सदर पात्र ठरलेल्या ३५ संस्थांना कार्यादेश देणे व करारनामे करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रस्त्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१४) * ४९५८० श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील रस्त्यांच्या कामासाठी मुंबई महानगरपालिकेने २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात १ हजार ८०० कोटींची तरतूद केली होती त्यानंतर आणखी ४०० ते ५०० कोटींची वाढ करत २ हजार ३०० कोटी रुपयांच्या निविदा मागविल्यानंतर ही कामे सुरु झाल्यानंतर कामे अपूर्णावस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामे निकृष्ट दर्जाची केल्याने ठिकठिकाणी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून नागरिकांना झालेल्या व होत असलेल्या त्रासाबाबत त्यांनी आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे सातत्याने तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानंतर मुंबईतील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी पुन्हा महानगरपालिकेने ६० कोटी खर्च केल्यानंतरही रस्त्यांच्या मूळ कामात तसेच खड्डे बुजविण्याच्या कामात मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याने या संपूर्ण प्रकरणाबाबत सखोल चौकशी करुन संबंधित दोषींविरोधात विनाविलंब ठोस कारवाई करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे पालिकेतील माजी विरोधी पक्षनेते यांनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदय यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने विनाविलंब सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मुंबईतील रस्ते दुरुस्त करण्याबाबत व उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधित दोषींविरोधात कठोर कारवाई होण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांच्या कामाकरिता सन २०२१-२२ मध्ये महानगरपालिकेमार्फत रु. २२८० कोटीच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामांचे कार्यादेश माहे जानेवारी, २०२२ ते मार्च, २०२२ पर्यंत देण्यात आले आहेत.

सदर कामाचा कालावधी पावसाळा वगळून १८ ते २४ महिने असा असून, सदर कामे पुढील तीन आर्थिक वर्षांत विभागली आहेत. त्यामुळे वाहतुक पोलीसांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर काही कामे हाती घेण्यात आली आहेत व उर्वरित कामे पुढील कालावधीत करण्यात येणार आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) सिमेंट कॉंक्रीटीकरणाद्वारे नवीन बनविण्यात आलेल्या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याचे दिसून आलेले नाही. तथापि दोषदायित्व संपलेल्या व निविदेत समाविष्ट नसलेल्या रस्त्यांवरील खड्डयांच्या तक्रारींबाबत विकसित करण्यात आलेल्या विविध तक्रार निवारण यंत्रणांमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(३) मुंबईतील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामात गैरव्यवहाराबाबतची बातमी दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या “महाराष्ट्र टाईम्स” या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुमारे २०५० कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. त्यापैकी ९९० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे कॉक्रीटीकरण पूर्ण करण्यात आले असून, उर्वरित डांबरी रस्त्यांची टप्प्याटप्प्याने सिमेंट कॉंक्रीटीकरणाद्वारे सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कमी वेळात मोठ्या प्रमाणात पडणारा पाऊस, मुंबईची भौगोलिक स्थिती, जमिनीखालील पाण्याची उच्चस्तर पातळी, मिश्र वाहनांची वर्दळ व घनता, रस्त्याशेजारील झोपडपट्टी व अन्य यांचे होणारे अतिक्रमण व उपयोगिता सेवा कंपन्यांमार्फत वारंवार होणारे खोदकाम तसेच डांबराच्या गुणधर्मानुसार पावसाळ्यात पाण्याच्या संपर्कात आल्यामुळे रस्त्यांवर खड्डे पडतात. सदर खड्डयांपैकी हमी कालावधीत नसलेल्या रस्त्यांवरील खड्डे विभागस्तरावर नेमलेल्या कंत्राटदारांमार्फत पुनर्स्थापित करण्यात येतात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार प्रत्येक विभागासाठी दरवर्षी खड्डे भरण्यासाठी रु.५० लाख व पावसाळापूर्वी दुरुस्तीसाठी रु.१.५० कोटी तरतूद करण्यात येते.

रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी सन २०२२-२३ या वर्षासाठी सुमारे रु.४८ कोटी इतक्या निधीची तरतूद केली असून ती आवश्यकतेनुसार वापरली जाते. तसेच यावर्षी लांबलेल्या पावसामुळे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये प्रत्येक विभाग कार्यालयास अतिरिक्त रु. ५ लाख रुपये खड्डे बुजविण्यासाठी देण्यात आले आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिका हद्दीतील मौजे चंद्रपाडा (जुचंद्र)**
**सं.क्र.९७ हि.क्र.६ जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत**

**(१५) * ५३९०२ श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिका हद्दीतील मौजे चंद्रपाडा (जुचंद्र) सं.क्र.९७ हि.क्र.६ जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत वारंवार तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तक्रारी प्राप्त झालेल्या असतांना देखील अतिरिक्त आयुक्त, वसई विरार महानगरपालिका यांनी कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत तसेच अनेक तक्रारींकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिका हद्दीतील मौजे चंद्रपाडा (जुचंद्र) सं.क्र.९७ हि.क्र.६ जागेवर महानगरपालिका स्थापनेपूर्वी ग्रामपंचायत काळापासून बैठी चाळ अस्तित्वात असल्याचे व सदर चाळीमध्ये रहिवास असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर जागेवर अनधिकृत बांधकाम निदर्शनास आल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये कार्यवाही करण्यात आली असून अनधिकृत बांधकाम हटविण्यासाठी पोलीस बंदोबस्त देण्याची विनंती महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी उचित कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

उपरोक्त तक्रारीचे गांभीर्य विचारात घेता, सदर प्रकरणी तात्काळ आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात येत आहेत.

तसेच गृह विभागास आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्याकरिता संबंधितांना सूचना देण्याबाबत कळविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची वसतिगृहे व निवासी शाळांसाठी**
**स्पर्धा परिक्षेकरिता पुस्तके खरेदी करण्याबाबत**

**(१६) * ५५०५३ श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची वसतिगृहे व निवासी शाळांसाठी स्पर्धा परिक्षेकरिता पुस्तके खरेदी करण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण यांच्या स्वाक्षरीने ३२ कोटी ३७ लाख रुपयांचा निधी दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास वितरित करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत कोणत्याही पुस्तकांची खरेदी वा वितरण न करता सदरील रक्कम काढण्यात आली असून कंत्राटदारांशी संगनमत करुन दुप्पट दराने पुस्तक खरेदी करुन अधिकचे १८ कोटी रुपये बळकावल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) महाराष्ट्रातील सर्व शासकिय निवासी शाळा, वसतिगृहे व अनुदानित वसतिगृहे यातील विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान, स्पर्धा परीक्षा व इतर परीक्षांसाठी मासिके उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक २३ जून, २०२२ च्या शासन निर्णयाने आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने रुपये ३२.४० कोटीच्या मर्यादेत पुस्तकांची/ मासिकांची यादी तयार करावी व सदर यादीस आयुक्तालयाच्या स्तरावर प्रशासकिय मान्यतेची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर आवश्यक निधी शासन स्तरावरुन उपलब्ध करुन वितरीत करण्यात येईल. असे शासन निर्णयात नमुद करण्यात आले होते.

त्यास अनुसरुन आयुक्त समाज कल्याण, पुणे यांनी शासनाच्या खरेदी प्रक्रियेच्या नियमानुसार सदर प्रकरणी दिनांक २० जुलै, २०२२ रोजी जेम्स पोर्टलद्वारे निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती व त्यानुसार उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करुन जेम्स पोर्टलद्वारे प्राप्त निविदाधारकांच्या दराचा लिफाफा दिनांक १३ ऑक्टोंबर, २०२२ रोजी उघडण्यात आला. त्यापैकी ज्यांची निविदा रक्कम सर्वात कमी रकमेची होती त्यांना L१ म्हणुन मान्यता देण्यात आली.

दरम्यान दिनांक १ एप्रिल, २०२२ नंतर मंजुरी दिलेल्या कामांना स्थगिती देण्याचे आदेश असल्याने दिनांक २१ जुलै, २०२२ च्या शासन निर्णयान्वये या बाबीस स्थगिती देण्यात आली होती. ही स्थगिती उठविण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींकडुन प्राप्त विनंतीस अनुसरुन शासनाच्या मान्यतेने दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये स्थगिती उठविण्यात आली आहे. त्यानंतर सदर बाबीस शासनस्तरावरुन निधी उपलब्ध करुन दिला आहे.

सदर मॉडेल सबस्क्रिप्शन मॉडेल असून सुरवातीस सबस्क्रिप्शन झाल्यानंतर लाभार्थ्यांना दर महिन्याला मासिके उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने मासिके खरेदी व वितरणाबाबत आयुक्त समाज कल्याण, पुणे यांनी दिनांक १९.१०.२०२२ रोजी पुरवठा आदेश निर्गमित केले असून त्यास अनुसरुन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर यांनी निधी वितरीत केला आहे.

(३) पुस्तके/मासिके पुरवठ्याबाबत विविध प्रसार माध्यमामध्ये बातम्या प्रसारीत होत असल्यामुळे आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या दिनांक १३.१२.२०२२ च्या आदेशाने पुस्तके/मासिके पुरवठ्याच्या कामास स्थगिती देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगर विकास प्राधिकरणच्या वतीने ई लिलावाद्वारे विक्रीस काढलेल्या १२ भूखंडाना तातडीने स्थगिती देण्याबाबत

**(१७) * ५०१९३ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील शेतकऱ्यांच्या जमिनी सन १९७२ मध्ये ताब्यात घेऊन औद्योगिक क्षेत्रातील नागरिकांना स्वस्त दरात घरकुल उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण (PCNDTA) चे विलीनीकरण पुणे महानगर विकास प्राधिकरण (PMRDA) मध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या अंदाजे सातशे कोटींच्या ठेवी व सुमारे दोन हजार हेक्टर पेक्षा जास्त मोकळ्या जमिनी तसेच कोट्यवधीच्या निधीची उद्योगनगरीच्या विकासासाठी आवश्यकता असताना PMRDA मध्ये विलीनीकरण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील पन्नास वर्षांपासून PCNDTA करिता जमीन ताब्यात देणाऱ्या शेतकऱ्यांना १२.५ टक्के प्रमाणे हक्काचा मोबदला देणे प्रलंबित असताना पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या (PMRDA) वतीने पूर्वीच्या पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण (PCNDTA) च्या मालकीच्या चिखली, निगडी, भोसरी परिसरातील व्यावसायिकदृष्ट्या मोक्याच्या जागेवरील १२ प्रमुख भूखंड आर्थिक हित जोपासत विकासकांना विक्रीकरिता ई-लिलावाद्वारे काढण्याची नोटीस शहरातील प्रमुख वृत्तपत्रांत व https://eauction.gov.in या वेबसाईटद्वारे प्रसिद्ध केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांचे पन्नास वर्षापासून प्रलंबित असलेले १२.५ टक्के भूखंड परतावा मिळवून देईपर्यंत पुणे महानगर विकास प्राधिकरण (PMRDA) च्या वतीने ई-लिलावाद्वारे विक्रीस काढलेल्या १२ भूखंडाना तातडीने स्थगिती देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.राज्यपाल व मा.मुख्यमंत्री महोदय यांना लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पुणे महानगर विकास प्राधिकरण (PMRDA) च्या वतीने ई-लिलावाद्वारे विक्रीस काढलेल्या व्यावसायिकदृष्ट्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या १२ भूखंडाना तातडीने स्थगिती देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. शासन अधिसूचना दि.०७/०६/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे विलीनीकरण पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये करण्यात आलेले आहे.
(२) शासन अधिसूचना दि.०७/०६/२०२१ मधील नियम क्र.७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नियमानुसार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील रोख / ठेव रक्कम रू. १२३,७६,९८,७७१/- च्या ठेवी तसेच अंदाजे ६०९ हेक्टर मोकळया जमिनीचा ताबा व मालकी ही पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे निहीत करण्यात आलेली आहे. तसेच नियम क्र.२ नुसार पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरणाने भाडेपट्ट्याने दिलेले, विकसित झालेले ९९६ हे. व ज्यावर अतिक्रमण झालेले आहे असे २७० हे. याप्रमाणे एकूण १२७६ हे. भूखंडाची मालकी व ताबा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे निहीत करण्यात आलेला आहेत.
(३) पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरणाच्या विलीनीकरणानंतर अधिसूचनेद्वारे विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार मालमत्तेचे विभाजन पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामध्ये केल्यानंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या ताब्यात आलेल्या वाणिज्यिक भूखंडांचा ई-लिलाव प्रक्रियेव्दारे विक्री करण्याबाबतची जाहिरात दि.२२/०८/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. या भूखंडांच्या लिलावानंतर उपलब्ध होणाऱ्या महसूला मधून नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.१२ वाणिज्य भूखंडांची ई-लिलाव प्रक्रिया पुर्ण झालेली असून ७ भूखंड विक्रीतून अंदाजे ७० कोटी इतका महसूल जमा झालेला आहे.
नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. पीसीएन/ १६८९/ २२८/ प्र.क्र.३१/ नवि-२२, दि. ०३/०३/१९९० व दि. १५/०९/१९९३ अन्वये ज्या जमीन मालकांच्या जमीनी दि. ०१/०१/१९८४ नंतर प्राधिकरणासाठी संपादन करण्यात आलेल्या आहेत, अशा एकूण ५६६ लाभार्थ्यांपैकी ३६५ लाभार्थ्यांना १२.५% जमीन परतावा देण्यात आलेला आहे. तसेच उर्वरीत २०१ लाभार्थ्यांना १२.५% जमीन परतावा देणे बाकी आहे. ह्या २०१ लाभार्थ्यांपैकी १४८ लाभार्थ्यांचे न्यायालयामध्ये दावे प्रलंबित असल्याने, ३५ लाभार्थ्यांच्या वारसा हक्काचे वाद असल्याने / कागदपत्रे अपूर्ण असल्याने १२.५% परतावा देण्याचे प्रलंबित आहेत.
(४) होय हे खरे आहे.
(५) व (६) १२ वाणिज्यीक भूखंडांची ई-लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री करण्याची जाहिरात दिनांक २२.०८.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती व सदर ई-लिलाव प्रक्रिया दिनांक ११.१०.२०२२ रोजी पूर्ण झालेली आहे. त्यापैकी ७ निविदा धारकांनी पैसे प्राधिकरणाकडे अंतिम दिनांकापूर्वी जमा केलेले आहेत. त्यामुळे स्थगिती देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हडपसर (जि.पुणे) येथील खडकवासला पाटबंधारे विभागाच्या नवीन कालव्यातील पाणी दुर्गंधीयुक्त व प्रदूषित असल्याबाबत

**(१८) * ५४६८९ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) येथील खडकवासला पाटबंधारे विभागाच्या नवीन कालव्यातील पाण्यावर प्रक्रिया करून महादेव नगर, मांजरी, फुरसुंगी या भागाला पाणीपुरवठा करण्यात येत असून या पाण्यावर पुर्ण प्रक्रिया न झाल्यामुळे नागरिकांना दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कालव्यातील पाणी दुर्गंधीयुक्त व प्रदूषित असल्याने तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेच्या लष्कर पाणीपुरवठा केंद्रामधून महादेवनगर व मांजरी या भागाला शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येत असून फुरसुंगी या भागासाठी तुकाईटेकडी येथील MJP ने बांधलेल्या ५ MLD पाणीपुरवठा केंद्रामधून शुद्ध पाणीपुरवठा केला जात असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) सदर भागात पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत जलवाहिन्या पाण्याच्या टाक्या व जलशुद्धीकरण केंद्र बांधण्याचे काम सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या निधी अभावी मिळाल्या नसल्याबाबत

**(१९) * ४९८२४ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या निधीअभावी मिळाल्या नसल्याचे तसेच अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना फ्रिशीप कार्डही मिळू शकले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर इतर मागासवर्गीय शिष्यवृत्तीची रक्कम मागील दोन वर्षापासून मिळालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) तसेच पुणे जिल्ह्यातील उच्च शिक्षण घेत असलेल्या ५२६ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मागील ५ वर्षापासुन शिष्यवृत्ती मिळाली नसल्याने विद्यार्थ्यांनी शिक्षण संचालकांकडे तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेतील तरतुदींचा स्वीकार राज्य शासनाने न केल्याने राज्यातील अनुसूचित जातींच्या साडेचार लाख विद्यार्थ्यांना वाढीव निर्वाह भत्त्यापासून वंचित राहावे लागत असल्याचेही दिनांक २६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती व निर्वाह भत्ता तातडीने मिळण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे आहे.
(५) केंद्र शासनाने अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रि-मॅट्रीक व पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनांसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

सदरील मागदर्शक सुचना राज्यात लागू करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधिन असून त्यातील शिफारशीच्या अनुषंगाने संबंधीत विभाग ज्यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग तसेच कौशल्य, उद्योजकता व रोजगार विभागामार्फत अभिप्राय मागविण्यात आलेले असून ते प्राप्त होताच सदरील मार्गदर्शक सुचनांची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मां.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येईल. मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रलंबित शिष्यवृत्ती अदा करण्याच्या दृष्टीने शासनस्तरावरून तसेच समाज कल्याण आयुक्तालय स्तरावरून राज्यातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना त्यांच्या अधिनस्त जिल्हयातील सर्व महाविद्यालयांना महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढण्याच्या दृष्टीने सूचना निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत. त्यानुसार सबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या कार्यालयामार्फत महाविद्यालयांना वेळोवेळी लेखी स्वरुपात तसेच व्हीडीओ कॉन्फरन्स व प्रत्यक्ष कार्यशाळा घेऊन अर्ज निकाली काढण्याच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विलेपार्ले (मुंबई) येथील गोल्डन टोबॅको कंपनीच्या आवारातील मोकळया जागेवर तात्पुरत्या परवानगीद्वारे कायमस्वरुपी स्टुडिओ उभारण्यात आल्याबाबत

**(२०) * ५२८३७ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विलेपार्ले (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या के-पश्चिम विभागाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या गोल्डन टोबॅको कंपनीच्या आवारातील मोकळया जागेवर तात्पुरत्या परवानगीद्वारे कायमस्वरुपी स्टुडिओ उभारण्यात आले असून, या स्टुडिओमध्ये दिवसरात्र सुरु असलेल्या चित्रीकरणामुळे मोठया प्रमाणावर ध्वनीप्रदूषण होत असल्याने तेथील नागरिकांनी याविरोधात आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे सातत्याने लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी तात्पुरती शेड उभारण्यासाठी परवानगी असताना त्या ठिकाणी पक्के बांधकाम करुन अनियमितता करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आठ एकरावर पसरलेल्या गोल्डन टोबॅको कंपनीच्या प्रवेशद्वारावर गुजरातमधील न्यायालयाचा प्रवेश बंदीचा आदेश आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त सर्व स्टुडिओ एकमेकांना लागून असल्यामुळे कोणतीही विपरीत घटना त्या ठिकाणी घडून मोठी जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता असल्याचे वॉच डॉग फाऊंडेशनचे पिमेंटा, निकोलस अल्मेडा ॲण्ड व्हिव्हिअन डिसोझा आदींनी मुंबई महापालिका आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त संपूर्ण प्रकरणासंदर्भात सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) विलेपार्ले येथे गोल्डन टोबॅको कंपनीच्या आवारातील मोकळ्या जागेवर एकूण ३ शेडपैकी शेड क्र. १ व २ साठी मे. ॲमीगोल्ड हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. यांना दिनांक ०१.१०.२०२२ ते दिनांक २७.०३.२०२३ पर्यंत तसेच, मे. एफ.एम. क्रिएशन प्रा.लि. यांना शेड क्र. ३ साठी दिनांक १५.१०.२०२२ ते दिनांक १५.११.२०२२ इतक्या कालावधीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१.०३.२०१९ च्या धोरणान्वये चित्रीकरणासाठी तात्पुरत्या स्वरुपात बांधकाम करण्याकरिता परवानगी देण्यात आली आहे.

त्यापैकी शेड क्र.३ चा परवानगी कालावधी संपुष्टात आल्यामुळे सदर शेड संपूर्णपणे निष्कासित करण्यात आली आहे.

तसेच, सदर स्टुडिओमध्ये दिवसरात्र सुरु असलेल्या चित्रीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनीप्रदुषण होत असल्याने तेथील नागरिकांनी या विरोधात लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत हे खरे आहे.

तथापि, सदर स्टुडिओमध्ये चित्रीकरणासाठी परवानगी दिलेल्या तात्पुरत्या शेडमध्ये ध्वनीरोधक साहित्य वापरले आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) गोल्डन टोबॅको विश्वस्त कार्यकारिणीविरोधात ॲरो इंजिनिअरींग लि. यांनी नॅशनल कंपनी लॉ ट्रॅब्युनल, गुजरात येथे आर्थिक दिवाळखोरीबाबत दावा दाखल केला असून, सदर प्रकरणी नॅशनल कंपनी लॉ ट्रॅब्युनल यांचेमार्फत इनसॉल्वन्सी रिजॉल्युशन प्रोफेशनल (Insolvency Resolution Professional) श्री. विचित्र नारायण पाठक यांची नेमणुक करण्यात आली आहे. त्यानुसार श्री.पाठक यांनी ENTRY RESTRICTED WITHOUT WRITTEN PERMISSION FROM COURT APPOINTED IRP MR PATHAK) अशा आशयाची प्रत गोल्डन टोबॅको कंपनीच्या प्रवेशद्वाराच्या दर्शनी भागावर लावली आहे.

त्यानुसार सदर परिसरात चित्रीकरण करण्याकरिता मे. ॲमीगोल्ड हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. यांनी आयआरपी श्री. पाठक यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर बाबतीतील तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.

तथापि गोल्डन टोबॅको आवारात चित्रीकरणासाठी परवानगी देण्यात आलेल्या एकूण तीन तात्पुरत्या शेडपैकी परवानगी कालावधी संपुष्टात आलेली एक शेड संपूर्णपणे निष्कासित करण्यात आली असून, उर्वरित दोन्ही शेडमध्ये सुमारे १०० मीटर इतके अंतर आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील स्टॅण्डहर्स्ट रोड येथील हॅकॉक ब्रीजच्या पूर्ण केलेल्या दोन्ही मार्गीका सुरु करण्याबाबत**

**(२१) * ५४४२७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील स्टॅण्डहर्स्ट रोड पश्चिमेकडील, शिवदास चापशी मार्गावरील मुंबई महानगरपालिकेने नव्याने बांधलेल्या हॅकॉक ब्रीजच्या दोनपैकी एकच मार्गीका दिनांक १ ऑगस्ट, २०२२ पासून वाहतुकीसाठी खुली केली असल्याने ब्रीजपासून नुरबाग पर्यंतच्या रस्त्यावर वाहतुक कोंडी होऊन या परिसरातील ज्येष्ठ नागरीक, विद्यार्थी तसेच सामान्य नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन तथा महानगरपालिकेने सदरहू वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी हॅकॉक ब्रीजच्या बांधकाम पूर्ण केलेल्या दोन्ही मार्गीका अद्याप सुरु न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू परिसरातील वाहतुक कोंडीची समस्या व रहदारीसाठी नागरीकांची होत असलेली गैरसोय दूर करणेकरिता शासनाने सदरहू हॅकॉक ब्रीजच्या दोन्ही मार्गीका वाहतुकीसाठी खुली करण्याकरिता अडसर ठरलेल्या प्रकल्प बाधितांचे त्याच परिसरात निवासी सदनिका देऊन अन्यथा महानगरपालिकेच्या मंजूर धोरणानुसार सदनिकांच्या बदल्यात आर्थिक मोबदल्याची रक्कम अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हॅकॉक ब्रीजचा दोन पदरी रस्ता म्हणजेच केवळ एक बाजूची वाहिनी वाहतुकीकरिता दिनांक १ ऑगस्ट, २०२२ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आली असून, त्या एका बाजूमधूनच (दक्षिण वाहिनी) येणारी व जाणारी वाहतूक होत असते. उर्वरित एक बाजू सदर ठिकाणी असलेल्या रहिवाश्यांचे पुनर्वसन न झाल्याने काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे सदर ठिकाणी ठराविक वेळेमध्ये वाहतुकीची कोंडी होत असते, असे गृह विभागाने कळविले आहे.

(२) सदर पूल चार मार्गिका पूल असून, त्यापैकी दोन मार्गिका सुरु आहेत. तसेच, सदर पुलाच्या बाजूला असलेल्या वसाहती व मालमत्ता यांचेकरिता सर्विस रस्ता नियोजित आहे.

सद्य:स्थितीत सदर सर्विस रस्त्याचे बांधकाम करण्याकरिता शिवदास चापशी मार्गाची २७.४५ मी. रुंदीची मंजूर रस्ता रेषा संपादन करणे आवश्यक असून, सदर मंजूर रेषा ६ म्हाडा वसाहती व इतर तळमजला इमारती यांनी बाधीत आहे.

सदर मंजूर रस्ता रेषा संपादन करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु असून, मंजूर रेषा संपादन झाल्यानंतर त्याठिकाणी आजुबाजूच्या मालमत्तांकरिता सर्विस रस्ता बांधणे शक्य होणार आहे व तद्नंतर उर्वरित पुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर मंजूर रस्ता रेषेमधील ६ म्हाडा निवासी वसाहतीचे निष्कासन करुन त्यांना निवासी सदनिका देणे ही बाब म्हाडा प्राधिकरणाशी सबंधित असून, त्याबाबत वेळोवेळी म्हाडा प्राधिकरणास अवगत करण्यात आलेले आहे.

तसेच, सदर मंजूर रस्ता रेषेमधील बाधीत तळमजला व्यावसायिक बांधकामधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या पडताळणीनुसार पात्र बांधकामधारकांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार आर्थिक मोबदला देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

तथापि, सदर आर्थिक मोबदला काही बाधीत पात्र बांधकामधारकांना मान्य नसल्यामुळे त्यांनी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक (एल) २५६२/२०२१ व २१८९४/२०२२ (एल) दाखल केली असून, सदर दोन्ही याचिका मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत.

सदर परिसरातील वाहतुकीची कोंडी दूर करण्याकरिता गृह विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत:-

- हॅकॉक ब्रीजवर सकाळी ७ ते दुपारी ३ व दुपारी ३ ते रात्री ११ या दोन सत्रात नेमणुक करण्यात आलेल्या पोलीस अंमलदारामार्फत वाहतुक नियमनांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येत आहे.
- हॅकॉक ब्रीज सुरु झाल्यापासून अद्यापपर्यंत ७० वाहने कर्षित करण्यात आली असून, २०५१ वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.
- हॅकॉक ब्रीजलगत दुतर्फा रोडवर वाहने पार्क होणार नाहीत याबाबत सदर ब्रीजलगत असलेल्या रहिवाशांना सूचना देण्यात आली आहे.
- सदर ब्रीजच्या लगत दुतर्फा रोडवर वाहने पार्क करण्यास प्रतिबंध होण्याकरिता दिनांक २९.०८.२०२२ रोजी जारी करण्यात आलेली अधिसूचना राजपत्रकामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.
- सदर पुलाच्या पूर्वेकडील रस्त्याच्या व पुलाच्या मध्यभागी असलेल्या इलेक्ट्रिक पोलमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघात होऊ नये व सदर रस्त्यावरील डेब्रीज व इतर साहित्य काढण्याकरिता क्षेत्रीय वाहतूक नियंत्रण विभाग, वरळी हब यांना दिनांक २०.१०.२०२२ रोजी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
- सदर पुलाच्या दोन्ही बाजूस योग्य अंतरावर नो-पार्किंगचे बोर्ड लावण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक २९.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) शहरात अस्वच्छता पसरल्याबाबत

**(२२) * ५२२७० श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम**

**थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) नगरपंचायतने शहराच्या स्वच्छतेकरिता ९१ लाख ७८ हजार रुपयांचे वार्षिक कंत्राट कृष्णाई ट्रेडर्स आणि कंट्रक्शन यांना दिले असतानाही शहरात ठिकठिकाणी अस्वच्छता पसरली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती शहरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सार्वजनिक लोकनिर्माण विभाग तसेच महानगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनेक ठिकाणी रस्त्यावरील गटारे व नाली उघडी असल्यामुळे तेथे अपघात होण्याची शक्यता असल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती महानगरपालिकेला सन २०२१ मध्ये राज्यात दुसरे तर राष्ट्रीय स्तरावर ७ वे मानांकन मिळाले होते. तथापि, अमरावती शहरात स्वच्छता कंत्राटदाराचे थकीत देयक, सफाई कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन विविध कारणांमुळे स्वच्छ भारत अभियान असफल झाले असून नुकत्याच जाहिर झालेल्या स्वच्छ भारत २०२२ च्या अभियानामध्ये अमरावती महानगरपालिकेची क्रमवारी १८ व्या तर राष्ट्रीय स्तरावर ८९ व्या स्थानावर खाली आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यातच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सन २०१८ पासून काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ पासून कामावरुन काढून टाकल्याने या कामगारांनी उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या सफाई कामगारांना तात्काळ कामावर रुजू करुन घेवून शहरातील अस्वच्छता दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीने शहरातील घनकचरा संकलन, वाहतुक व प्रक्रिया यासाठी दिनांक ०१/१०/२०२२ पासून कृष्णाई ट्रेडर्स ॲन्ड कन्स्ट्रशन प्रा.लि. अमरावती यांना रूपये ७३.२० लक्ष इतक्या रकमेचे वार्षिक कंत्राट दिले आहे. या कंत्राटदारांने कामास सुरूवात केली आहे. नगरपंचायतीच्या स्वच्छता अभियंता यांच्याकडून कामाची वेळोवेळी तपासणी केली जाते. अस्वच्छतेबाबत नागरीकांनी नगरपंचायतीकडे तक्रार केलेली नाही. याबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडूनही अहवाल प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ चे अमरावती महापालिकेचे राज्यस्तरावरील मानांकन हे स्वच्छ सर्वेक्षण २०२१ प्रमाणेच १८ व्या क्रमांकावर आहे. राष्ट्रीय स्तरावर मानांकन हे ८९ क्रमांकावर आहे. स्वच्छ भारत २०२२ सर्वेक्षणाचे अंतीम मार्गदर्शिकेमध्ये अनेक बदल तसेच शहरांमधील वाढती स्पर्धा या पार्श्वभूमीवर मानांकन खाली आले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सदर संबंधित २३ कामगारांनी कामगार उपायुक्त कार्यालय, अमरावती येथे त्यांना पूर्ववत कामावर घेण्यासाठी दिनांक ०६/१०/२०२२ रोजी तक्रार दाखल केली असून याबाबत त्यांच्याकडे दिनांक १२/१२/२०२२ रोजी सुनावणी झाली. याबाबत कृष्णाई ट्रेडर्स ॲन्ड कन्स्ट्रक्शन प्रा.लि. अमरावती यांनी कामगार सहाय्यक आयुक्त, अमरावती यांच्याकडे दिनांक ०९/११/२०२२ रोजी केलेल्या खुलाशानुसार पूर्वीच्या कंत्राटदाराकडील कामगार टप्याटप्याने कामावर घेण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट गावांमध्ये मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(२३)** * **४९५६३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या शिवणे, नऱ्हे, धायरी, उत्तमनगर व इतर सर्व गावांमध्ये अद्यापही तीव्र पाणी टंचाई, मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव असून पाणी पुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, विद्युत व्यवस्था, आरोग्य सेवक कामगार भरती अशा अनेक बाबींमुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या दालनात समाविष्ट गावांच्या ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान बैठक आयोजित केली असून, सदर प्रकरणी महानगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारची ठोस कार्यवाही केली नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये पूर्वीप्रमाणे ग्रामपंचायतीमार्फत घनकचरा व्यवस्थापन, विद्युत व्यवस्था, पाणी पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे सद्यस्थितीमध्ये दुरूस्तीची कामे करण्यात येत आहेत.

समाविष्ट झालेल्या गावांमध्ये अस्तित्वात असलेले पाण्याचे जाळे (Network) अपुरे असल्याने प्रतिदिन सुमारे ५२५ पाण्याच्या टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

या गावांमध्ये विद्युत व्यवस्था करण्यासाठी रू.५०० कोटी चे वार्षिक खर्च अपेक्षित असून निविदा प्रक्रिया पूर्ण करून नविन पोल उभारून प्रकाश व्यवस्था करण्याचे कामे प्रगती पथावर आहे.

तसेच या गावांमधील निर्माण होणारा अंदाजे ४०० मे.टन. प्रतिदिन कचरा कुठेही ओपन डम्पिंग न करता या सर्व कचऱ्याची पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या कचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येत आहे. या गावांच्या घनकचरा व्यवस्थापन विषयक कामासाठी आवश्यक असणाऱ्या ९५१ कंत्राटी सफाई आरोग्य सेवक नेमणूक करण्यात आलेली असून यासाठी अंदाजे २३.५० कोटी वार्षिक खर्च अपेक्षित असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(२) पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट गावांच्या सोईसुविधांबाबत महानगरपालिकेत बैठक संपन्न झालेली आहे. त्याअनुषंगाने पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी तज्ञ सल्लागार म्हणून मे.ए.एल.एन मालविया एन्फ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड यांना नव्याने समाविष्ट झालेल्या गावांचे डि.पी.आर. तयार करण्यासाठी नियुक्ती करण्यात आलेले आहे. त्यांनी सुस-म्हाळुंगे व बावधन बुद्रुक या गावांचा डि.पी.आर. तयार असून त्यानुसार पुढील प्रक्रिया सुरू आहे.

तसेच या गावांच्या मलनि:सारणाच्या कामासाठी डी.पी.आर. तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागार म्हणून मे.प्रायमुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंट प्रा.लि. यांची नेमणूक करण्यात आलेली असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नवी मुंबईतील इमारतींना सिडकोने नियमबाह्य दिलेली परवानगी

**(२४) * ५३९१४ श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील जवळ जवळ सर्वच इमारतीना सिडकोने २०१५ ते २०१७ या कालावधीमध्ये नियमबाह्य परवानगी दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने नियमबाह्य परवानगी दिलेल्या सदर इमारतीतील रहिवाश्यांवर आता कारवाई केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडकोच्या चुकीमुळे निर्माण झालेल्या प्रकरणी मा.न्यायालयाचा वेगळा निर्णय झाल्यास रहिवाशांचे आर्थिक नुकसान होणार आहे त्यामुळे त्यांना संरक्षण देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच रहिवाशांना संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) अधिमुल्य आकारणी करून कपबोर्ड, फ्लॉवर बेड इ. बाबी चटई क्षेत्र निर्देशांक मुक्त करून त्या अनुज्ञेय करण्याची तरतूद नवी मुंबई क्षेत्रासांठी लागू असलेल्या सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावली, १९७५ मध्ये समाविष्ट करण्याअनुषंगाने सिडको संचालक मंडळाने दि.२३.१२.२००४ रोजी ठराव पारित करून त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) ची वैधानिक कार्यवाही पुर्ण करून सिडको संचालक मंडळाने दि.०२.१२.२००५ रोजी ठराव पारीत करून तसा प्रस्ताव सिडकोने दि.०९.०१.२००६ च्या पत्रान्वये शासनास मंजूरीकरीता सादर केला होता. सदरच्या फेरबदल प्रस्तावास शासनाकडून कलम ३७(२) मधील तरतूदीनुसार मंजूरी मिळण्यापुर्वीच संचालक मंडळाच्या मंजूरीने व सिडकोने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार सदर तरतुदीची अंमलबजावणी सिडकोकडून करण्यात येत होती. या संदर्भात श्री.संजय कुमार सुर्वे यांनी शासनाकडे तक्रार दाखल केली असुन मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१५४/२०१६ दाखल केली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असुन, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, प्रकरणी त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### गोवंडी (मुंबई) येथील महानगरपालिकेचे पंडित मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालयात आरोग्य विषयक सोयी सुविधेसह कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२५) * ५४१२८ श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या शताब्दी रुग्णालयात विविध आरोग्य सोयी-सुविधांचा अभाव असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या रुग्णालयात चेंबूर, गोवंडी, मानखुर्द, शिवाजीनगर, अनुशक्ती नगर, वाशी नाका, ट्रॉम्बे चिता कॅम्प, माहुलगाव आणि गव्हाणगाव भागातील गोरगरीब रुग्ण येत असून सोयी-सुविधांच्या अभावामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शताब्दी रुग्णालयात आरोग्यविषयक सोयी-सुविधेसह कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

पं. मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालय हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे २१० रुग्णशैय्येचे माध्यमिक आरोग्य सेवा देणारे उपनगरीय रुग्णालय आहे. सदर रुग्णालयामध्ये वैद्यकीय विभाग, शल्यचिकित्सा विभाग, बालरुग्ण विभाग, नाक-कान-घसा विभाग, नेत्र विभाग, अस्थिव्यंग विभाग, प्रसुती व स्त्रीरोगशास्त्र विभाग, मनोविकास विभाग, पॅथॉलॉजी विभाग, क्ष-किरण विभाग, कुटुंब नियोजन विभाग, प्रसुतीपश्चात विभाग, आर.एन.टी.सी.पी. (क्षयरोग) विभाग, व्ही.सी.टी.सी. विभाग, अतिदक्षता विभाग, अपघात विभाग, एम.आर.आय. विभाग, रक्तपेढी, डायलेसिस केंद्र तसेच महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना, जीन एक्सपर्ट यांची सेवा उपलब्ध आहेत.

सदर रुग्णालयामध्ये उपरोक्त विभागांची आंतररुग्ण व संबंधित विभागांच्या शस्त्रक्रिया या सेवा, सी.टी. स्कॅन व एम.आर.आय. या अद्ययावत निदान सुविधा उपलब्ध आहेत. तसेच सदर रुग्णालयामध्ये सर्व प्रकारची औषधे उपलब्ध असून रुग्णांना मोफत पुरविली जात असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) गोवंडी शताब्दी रुग्णालयात चेंबूर, गोवंडी, मानखुर्द, शिवाजीनगर, अनुशक्ती नगर, वाशी नाका, ट्रॉम्बे चिता कॅम्प, माहुलगाव आणि गव्हाणगाव भागातील रुग्णांना आरोग्याच्या सोयी-सुविधा मिळत नसल्याची तक्रार कार्यासनाच्या अभिरक्षेत आढळून आली नाही.

तसेच अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे महानगरपालिकेने देखील कळविले आहे.
(३) सदर रुग्णालयामध्ये अद्ययावत सोयी-सुविधा पुरविण्याकरीता महानगरपालिकेमार्फत सन २०२२-२३ मध्ये रु.५९.१२ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सदर रुग्णालयातील कामगारांची रिक्त पदे भरण्याकरिता कंत्राटी तत्वावर प्रचलित पध्दतीने बहुउद्देशीय कामगार नियुक्त करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील वक्फ बोर्डाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

**(२६) * ५१३४८ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील वक्फ बोर्डाच्या मौजे आमने सर्वे नं.३७ क्षेत्र ६४.५० हे.आर. या जमिनीवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करुन गोडावूनचे बांधकाम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीच्या नोंदीमध्ये चुकीच्या पध्दतीने फेरफार करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार तहसिलदार यांच्याकडे पाठपुरावा करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर जागेवरील अनधिकृत बांधकाम हटविण्याबाबत तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे. प्रथम दर्शनी भिवंडी तालुक्यातील माउजे आमणे येथील सर्वे क्रमांक ३७ मधील मालमत्तेची वक्फ मंडळाकडे नोंद आढळून आलेली नाही. तथापि, या देवस्थान इनाम (वर्ग-३) च्या मालमत्तेवर अतिक्रमणे आढळून आली असल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(२) आणि (३) सदर जमीनीच्या भोगवटादार सदरी पिर हुसेन आस बीबी अ.अहमद सलाउद्दीन अशी नोंद असून इतर हक्क सदरी खाजगी व्यक्तींची नोंद आहे. सदर जमीन पिर हुसेन आस बीबी अ. अहमद सलाउद्दीन या देवस्थान (इनाम वर्ग-३) ची असल्याचे आढळून आल्याने तहसिलदार भिवंडी यांनी दि.१४.११.२०२२ च्या आदेशान्वये सदर जमीन देवस्थानच्या नावे पूर्ववत करण्याचे आदेश दिले असून त्यानुसार फेरफार क्र.४१७९ अन्वये सदर जमीनीवर पिर हुसेन आस बीबी अ. अहमद सलाउद्दीन या नावाची नोंद घेण्यात आलेली आहे.
(४) सदर जमीनीची महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने प्रत्यक्ष पाहणी केली आहे. तथापि, प्रथम दर्शनी सदर जमीनीची वक्फ मंडळाकडे नोंद आढळून आलेली नाही. सदर मालमत्ता वक्फ आहे किंवा कसे याबाबत वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार वक्फ मंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. सदर मालमत्ता वक्फ मंडळाची असल्याचे निष्पन्न झाल्यास सदर जागेवरील अतिक्रमण हटविण्याबात वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ५४ मधील तरतूदीनुसार वक्फ मंडळाकडून कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील विकासकामांना दिलेली स्थगिती उठविण्याबाबत

**(२७) * ५०३२४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाच्यावतीने विविध योजनेंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली या तालुक्यासाठी अनेक विकास कामे मंजूर करण्यात आली असून या सर्व कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता सुध्दा प्राप्त झालेली असताना सुध्दा शासनाने माहे जुलै,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान परिपत्रक काढून दिनांक १ एप्रिल, २०२१ पासून मंजूर असलेल्या सर्व कामांना स्थगिती दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे सार्वजनिक हितास्तव आवश्यक असल्याने या कामांना दिलेली स्थगिती उठवून विकास कामे सत्वर सुरू करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे,
मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदेशानुसार राज्य शासनाच्या विविध विभागांतर्गत दि.०१.०४.२०२१ पासून आतापर्यंत जिल्हा वार्षिक योजना, राज्यस्तरीय योजना, आदिवासी उप योजना तसेच विशेष घटक योजना इत्यादी निधीतून मंजूर करण्यात आलेल्या परंतु निविदा न काढलेल्या कामांच्या अंमलबजावणीस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यासंबंधीचे रितसर प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचेसमोर सादर करण्याबाबत मा. मुख्य सचिव यांनी दि.१८.०७.२०२२ च्या टिप्पणीन्वये कळविले होते. त्यानुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील कोणत्याही प्रकरणास शासन स्तरावरुन स्थगिती देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले नाहीत. मात्र दि.०१.०४.२०२२ नंतर यापूर्वीच्या सरकारने या विभागाच्या संबंधित घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सर्वसाधारण वर्गवारी नमूद करुन प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांना अवलोकनार्थ सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर विकास कामांच्या संदर्भात १) जिल्हा वार्षिक योजना

(विघयो) २०२२-२३ अंतर्गत जिल्हा नियोजन समित्यांनी दिलेल्या विविध कामांच्या प्रशासकीय मान्यतांना दि.२१.०७.२०२२ अन्वये तसेच २) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत दि.१ एप्रिल, २०२२ नंतर जिल्हा बीड, परभणी, ठाणे, मुंबई (शहर), कोल्हापूर या जिल्ह्यांमधील रु.१४६.९२ कोटी इतक्या रक्कमेची विविध कामे मंजूर करण्यात आली होती. त्यास दि.२१.०७.२०२२ अन्वये स्थगिती देण्यात आली होती.

उपरोक्त विकासकामांच्या योजनांना देण्यात आलेली स्थगिती अनुक्रमे दि.०३.११.२०२२, व दि.०४.११.२०२२ अन्वये उठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील रिक्षा व वाहन चालक वाहतूक नियमांचे उल्लंघन करीत असल्याबाबत

**(२८) * ४९९७२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पनवेल, कळंबोली, नविन पनवेल, खांदा कॉलनी, कामोठे परिसरातील रिक्षा व वाहन चालक १२ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक करून वाहतूक नियमांचे उल्लंघन करीत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या रिक्षा व वाहन चालकांवर लक्ष ठेवण्यासाठी शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक शाळेत परिवहन समिती स्थापन करण्याची सक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळांमधील परिवहन समितीच्या निष्काळजीपणामुळे वाहन व रिक्षा चालकांकडून वाहतूक करताना विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांच्या वायुवेग पथकाने माहे एप्रिल, २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत एकूण १३२० शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करुन ४५२ वाहनांना तपासणी प्रतिवेदने जारी करण्यात आली आहेत. या कारवाईमध्ये दोषी आढळलेल्या वाहन धारकांकडून एकूण रु.५,७५,७००/- इतके तडजोड शुल्क व रु.२८०००/- इतका कर वसूल करण्यात आला आहे.

(२) प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये एकूण ५६ परिवहन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तसेच ५६ शांळामध्ये परिवहन समितीच्या बैठका झालेल्या आहेत.

(३) व (४) परिवहन समितीच्या निष्काळजीपणामुळे वाहन व रिक्षा चालकांकडून वाहतूक करताना विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याचे प्रकरण निदर्शनास आले नाही. प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत नियमितपणे तपासणी करुन मोटार वाहन कायद्याअंतर्गत तरतूदीप्रमाणे कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## जोगेश्वरी (मुंबई) येथील विकासक मे.कल्पतरु यांनी शासनाची केलेली फसवणूक

**(२९) * ५२१५८ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई) येथील मजास न.भू.क्र.३३ या औद्योगिक क्षेत्राचे आरक्षण असलेल्या जागेवर विकासक मे.कल्पतरु यांचेमार्फत निवासी संकुलाचे काम करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंडावरील औद्योगिक क्षेत्राचे आरक्षण निवासी क्षेत्रामध्ये बदल करण्यासाठी विकासकाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस १२१० चौ.मी. एकत्रित जागा सार्वजनिक सुविधेकरिता मिळणे अपेक्षित असताना विकासकाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस ७४० चौ.मी. व ४७० चौ.मी. असे दोन स्वतंत्र भूखंड देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भूखंडावरील मालमत्ता पत्रकावरील क्षेत्रफळ व विकासकाने सादर केलेल्या आराखडयातील क्षेत्रफळ यामध्ये तफावत असून या परिसरातील मजास नाल्याची जागा बंदिस्त करुन ती घेण्याचा प्रयत्न विकासकाकडून करण्यात आला आहे, शेजारील झोपड्यांबाबत कोणतीही सुरक्षात्मक उपाययोजना न केल्याने झोपडीधारकांच्या जीवितासही धोका निर्माण झाला आहे तसेच सदरहू प्रकल्पाकरिता विकासकाने १०२ वृक्षांची बेकायदेशीररित्या तोड केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच याच विभागातील मौजे न.भू.क्र.१६६ व १६७ या भूखंडावर मे.कल्पतरू या विकासकाकडून विकास करताना विकासकाने ज्या सार्वजनिक सुविधांचे आरक्षण त्या भूखंडावर होते त्या सुविधा अद्याप बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केल्या नसून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संबंधित विकासकास संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी.) देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी दोषी आढळून येणारे संबंधित अधिकारी / कर्मचारी व विकासक यांचेवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प), बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विकासक मे.कल्पतरू व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती फौजदारी व दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) जोगेश्वरी येथील मजास न.भू.क्र. ३३ हा भूखंड विकास आराखडयानुसार औद्योगिक क्षेत्रामध्ये समाविष्ट होता. तथापि, विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदींनुसार सदर औद्योगिक क्षेत्राचा वाणिजिक / निवासी वापर असा बदल करण्यात आला आहे. असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) जोगेश्वरी (पूर्व) येथील न.भु.क्र. ३३ अ, ६२ व ७६ मौजे मजास या भूखंडावर मे. डायनाक्राप्ट मशीन कं. लि., या विकासकाच्या वतीने औद्योगिक क्षेत्राचा वाणिजिक / निवासी वापर असा बदल करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर वापर बदल करण्याकरिता आवश्यक असलेले ७४० चौ. मी. क्षेत्राचा सुविधा भूखंड विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदीनुसार मंजूर अभिन्यासात बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याकरिता देण्यात आला होता.

तद्नंतर विकासकाने सदर जागेचा विकास हा बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ नुसार करण्याचे प्रस्तावित केल्यामुळे, त्यातील तरतुदीनुसार ४७०.२४ चौ.मी. क्षेत्राचा अतिरिक्त सुविधा भूखंड मंजूर अभिन्यासात देण्यात आला आहे.

न.भु.क्र. ३३ अ, ६२ व ७६ या भूखंडाचा बहुतांश भाग नाल्याने बाधित असल्यामुळे भूखंडाचे नैसर्गिक विभाजन झाले आहे. सदर दोन्ही सुविधा भूखंड महापालिकेच्या रस्त्याला लगत आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) जोगेश्वरी येथील मजास न.भू.क्र. ३३अ या भूखंडाच्या मिळकत पत्रिकेवर नमूद ८,४३६.३० चौ.मी. क्षेत्राऐवजी २२,५१६.९० चौ.मी. असे क्षेत्र दाखल केले असल्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

सदर भूखंडाशेजारी अस्तित्वात असलेल्या झोपड्यांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षात्मक उपाययोजना करण्याबाबत संबंधित विकासकास दिनांक १२.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर भूखंडावरील १०० बेकायदेशीररित्या केलेल्या वृक्षतोडी प्रकरणी संबंधित विकासकाविरुध्द दिनांक १९.१०.२०२२ रोजी स्थानिक पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८ व सहकलम २१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) मौजे न.भू.क्र. १६६ अ (भाग) या भूखंडाच्या मालकी हक्काबाबत मा. न्यायालयात सन २००४ पासून दावा दाखल असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सद्य:स्थितीत सदर भूखंडावरील बृहन्मुंबई विकास आराखड्यातील आरक्षित असलेली आरक्षणे कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात आहेत. कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यातील आरक्षणांतर्गत येणारे भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याकरिता मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून निर्देश घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

मौजे न.भू.क्र. १६७ अ (भाग) या भूखंडावरील विकास आराखड्यानुसार असलेली काही आरक्षणे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ताब्यात घेण्यात आली आहेत. तसेच, महापालिका प्राथमिक शाळा या आरक्षणांतर्गत असलेल्या भूखंडाचा विकास करण्यासाठी मे. कल्पतरु या विकासकाकडून परवानगी घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

मौजे न.भू.क्र. १६६ अ (भाग) व १६७ अ (भाग) या भूखंडावरील इमारतींना काही अटी व शर्तीसापेक्ष भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेस अद्यापही हस्तांतरीत न केलेल्या आरक्षित भूखंडाच्या क्षेत्रफळाचा कोणताही चटईक्षेत्र निर्देशांक विकासकास देण्यात आलेला नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) व (६) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक २३ एप्रिल, २०२२ रोजीचे निवेदन प्राप्त झाले असून, त्यानुषंगाने झालेल्या बैठकीत, सदर भूखंडांना विकास परवानगी देताना कोणतीही अनियमितता झालेली नसल्याने तसेच, मौजे न.भू.क्र. १६६ अ (भाग) या भूखंडाच्या मालकी हक्काबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे स्थानिक लोकप्रतिनिधींना अवगत करण्यात आले आहे.

-----------------

## मौजे भांबोरा (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथे अतिवृष्टीमुळे शेतपिकांच्या झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत

**(३०) * ५४६९० ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भांबोरा (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथे दिनांक १० ऑगस्ट २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे अप्पर वर्धा धरणाचे पाणी सोडल्याने शेतात पाणी जमा होऊन तसेच माती वाहुन गेल्याने शेतपिकांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्पर वर्धा धरणाचे पाणी सोडल्यामुळे शेतातील पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत नुकसान भरपाई मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ सप्टेंबर, २०२२ रोजी कार्यकारी अभियंता, उध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, यांच्या अहवालानुसार शेतीपीकांचे नुकसान अतिवृष्टीमुळे झालेले आहे. माहे जून ते ऑगस्ट-२०२२ या कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती पिकांचे व शेतजमिनीच्या नुकसानीकरिता शासन निर्णय महसूल व वन, दि.०८.०९.२०२२ अन्वये रु.३५०१७१.२१ लक्ष इतका व शासन निर्णय दि.२८.०९.२०२२ अन्वये रू.३३५१७.५० लक्ष असा एकूण ३८३६८८.७१ लक्ष इतका निधी सर्व विभागीय आयुक्त यांना वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर निधीपैकी अमरावती जिल्ह्यातील शेती पिकांच्या व शेतजमिनीच्या नुकसानीकरिता अनुक्रमे रु.५४२१९.५३ लक्ष व रू.१८०६.८२ लक्ष असा एकूण रू.५६०२६.३५ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. त्यामधून मौजे भांबोरा येथील बाधित २४५ शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागामार्फत १०० टक्के अनुदानित मागासवर्गीय वसतीगृह कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याबाबत

**(३१) * ५५२६२ डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत २३८८ स्वयंसेवी संस्थामार्फत अनुसुचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी मागासवर्गीय अनुदानित वसतिगृह विविध स्वयंसेवी संस्थामार्फत चालविले जात असून येथील कर्मचाऱ्यांना अल्पशा मानधनावर काम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच धर्तीवर राज्यात स्वयंसेवी संस्था मार्फत वि.जा.भ.जा, आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांना जोडलेल्या वसतिगृहातील कर्मचारी हे नियमित वेतन श्रेणीवर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाला वेतनश्रेणी तर एकाला मानधन अशी एकाच विभागात काम करणाऱ्या एकाच श्रेणीतील कर्मचाऱ्यांमध्ये वेतन तफावत ठेवण्यात आली आहे, हे खरे आहे काय

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य अनुदानीत वसतीगृह कर्मचारी संघटनेने स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या मागासवर्गीय अनुदानीत वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागु करण्याची मागणी केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांना विभागाच्या धोरणानुसार मानधन देण्यात येते.

(२) होय.

(३) सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्था संचलित वसतिगृहातील कर्मचारी हे मानधन तत्वावर कार्यरत आहेत.

(४) महाराष्ट्र राज्य अनुदानित वसतिगृह कर्मचारी संघटनेकडून डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात शासनास निवेदन प्राप्त झाले आहे.

(५) अनुदानित वसतिगृह कर्मचारी हे मानधन तत्वावर नियुक्त कर्मचारी असल्याने त्यांना वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**पुणे शहरातील फुलेवाडा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले**
**या स्मारकांच्या विस्तारासाठी भूसंपादन करण्याबाबत**

**(३२) * ४९४८४ श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील भिडेवाडा या ऐतिहासिक वास्तूची फुलेवाडा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या स्मारकाच्या विस्तारासाठी भूसंपादन करण्याकरीता लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ व ३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही स्मारकांचे एकत्रीकरण व विस्तारीकरण करण्यासाठी सभोवतालच्या भागाचे भूसंपादन-विकसन होण्यासाठी नगरविकास विभागाने दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ रोजी हा निवासी झोन स्मारकासाठी आरक्षित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भिडेवाडा ही वास्तू ताब्यात घेवून या ठिकाणी "सावित्रीबाई फुले आद्य मुलींची शाळा" सुरु करून राष्ट्रीय दर्जाचे स्मारक करण्याबाबत माहे मार्च, २०२२ मध्ये निर्णय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासाठी दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास भिडेवाड्यासमोर ज्येष्ठ समाज सेवक बाबा आढाव यांनी आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) या विषयाबाबतचे लोकप्रतिनिधीचे दि.१५.०८.२०२२ व दि.९.११.२०२२ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.

(२) महात्मा फुले वाडा स्मारक व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक एकत्रिकरण व विस्तारीकरण म्हणून आरक्षित करण्याबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ (१कक) अन्वये दि.०२.०३.२०२० रोजीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने नगर विकास विभागाकडून अधिनियम कलम ३७(१कक) अन्वये दि.२५.११.२०२१ रोजी शासन सूचना प्रसिध्द केली असून, प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकतींवर सुनावणी देण्याकरीता तसेच प्रस्तावानुषंगाने पुढील वैधानिक कार्यवाही पूर्ण करून शासनास अहवाल सादर करण्याकरीता सह संचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे यांना "अधिकारी" म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. नियुक्त अधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावास अंतिम मंजूरी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) या प्रकरणी माहे मार्च, २०२२ मध्ये कोणताही निर्णय निर्गमित झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, तत्कालीन मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.११.०२.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत भिडेवाडा या वास्तुस राज्य संरक्षित स्मारक घोषित करणे असा निर्णय घेण्यात आला होता.

(४) हे खरे आहे.

परंतू याबाबत कोणताही पत्रव्यवहार महानगरपालिकेडे प्राप्त झालेला नसल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(५) व (६) सदर वास्तुच्या जागेचे भूसंपादनाबाबतचे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

-----------------

**मुंबई गोवा महामार्गाला समांतर असलेल्या रेड्डी ते रेवस या**
**सागरी महामार्गाचे प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत**

**(३३) * ४९९४३ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय म्हणून ५४० कि.मी. लांबीचा रेड्डी ते रेवस सागरी महामार्ग बांधण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी नेमलेल्या एजन्सीने सर्वेक्षणाचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सागरी महामार्गावरील शिर्से ते दांडा पूलाची दुरुस्ती, जैतापूर-चिरेखाण-आंबेरी पुलापर्यंतचा रस्ता दुरुस्ती तसेच डोंगरतिठा ते सांगने या मंजूर रस्त्यांची कामे त्वरीत सुरु करण्याची उपाध्यक्ष, पंचायत समिती युवा मोर्चा यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या निवेदनान्वये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर कामास निधी उपलब्ध करुन रेड्डी ते रेवस या सागरी महामार्गाचे प्रलंबित काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने रेवस ते रेड्डी या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तीन सल्लागारांची नियुक्ती केली असून त्यांनी अंतिम आखणी शासनास सादर केली होती. शासनाने दिनांक १६.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या अंतिम आखणीनुसार प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.
(३) सदर निवेदन शासन नस्तीला (कार्यासन रस्ते-८) मध्ये आढळून येत नाही.

तथापि, या आशयाचे युवा मोर्चा उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टीचे, सागवे पंचायत समिती यांचे दिनांक २७.०८.२०२२ रोजीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग, राजापूर यांच्याकडे दिनांक ०१.०९.२०२२ रोजी प्राप्त झाले आहे.
(४) उत्तर रत्नागिरी विभागांतर्गत येणारा शिर्से ते दांडे पुलाच्या दुरुस्तीच्या काम मार्च, २०२१ च्या अर्थसंकल्पात मंजूर असून सदर कामाची निविदा स्विकृत करण्यात आली आहे. कार्यारंभ आदेशाची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रगतीपथावर आहे. तसेच, रेवस रेड्डी रस्ता प्रRामा ४ वरील जैतापूर ते चिरेखाण आंबेरी या लांबीचे काम अर्थसंकल्पात मंजूर असून या लांबीपैकी या कामातील नाटे ते चिरेखाणी या लांबीचे काम पुर्ण झाले आहे. चिरेखाणी फाटा ते आंबेरी या लांबीचे काम प्रगतीत आहे. सागवे नाणार डोंगर कणेरी राजापूर रस्ता ही लांबी प्रजिमा ७२ ची असून या लांबीचे डांबरीकरणाचे काम मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पातून मंजूर आहे. सद्य:स्थितीत सदरची कामे निविदा स्तरावर आहेत. निविदा निश्चिती करुन काम हाती घेण्यात येईल. सावंतवाडी विभागांतर्गत येणाऱ्या सर्व लांबीतील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थीत ठेवण्यात आलेला आहे. तसेच, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून रेवस ते रेड्डी या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यावर प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्याचे प्रस्तावित आहे. शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यावर तसेच प्रकल्पासाठी निधीची उपलब्धता झाल्यावर प्रत्यक्षात कामे सुरु करण्याचे नियोजीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील कल्याण पत्रीपूल ते शीळफाटा रस्त्याच्या रुंदीकरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(३४) * ५३९३४ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन**

**पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण पत्रीपूल ते शीळफाटा या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी २०० शेतकऱ्यांची १७ एकर जमीन बाधित होऊन आजमितीस ४ वर्षाहून अधिक कालावधी उलटून गेला तरीही सदरहू बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला लवकरात लवकर मिळावा म्हणून त्यांनी सातत्याने पालक मंत्री, ठाणे जिल्हा, नगर विकास मंत्री, जिल्हाधिकारी, ठाणे आदीकडे लेखी निवेदनान्वये मागणी करुनही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने सर्वपक्षीय युवा मोर्चा व कल्याण पत्रीपूल ते शीळफाटा रस्ता बाधित शेतकऱ्यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ पासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीच्या अहवालाबाबत केवळ बैठका घेण्यात आल्या परंतु आजमितीस सदरहू समितीने आपला अहवाल सादर केला नसल्यामुळे प्रकल्प बाधित शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित जमिनीचा योग्य तो मोबदला विनाविलंब अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी कल्याण शिळफाटा या २१ कि.मी. रस्त्याचे बांधकाम व रुंदीकरण सन १९९०-९१ पुर्वी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत व सन १९९१-२००० साली बांधकाम व रुंदीकरण कल्याण डोंबिवली व ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आले असल्याबाबतची तपासणी करुन, याबाबतचे भूसंपादन व भुसंपादनाचा मोबदला बाधीत भुधारकांना व शेतकऱ्यांना देण्यात आला किंवा कसे याबाबत तपासणी करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी शासन निर्णय क्र. बैठक-२०१८/ प्र.क्र.१५९/रस्ते-८ दिनांक १३.०५.२०२२ अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय यांचे पत्र क्र. उजि / समन्वय / टे-१ / भिवंडी-कल्याण शिळफाटा / अहवाल / कावि / १८५६ / २०२२ दि.११.११.२०२२ अन्वये प्राप्त झाला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) शहरातील बस स्थानकाजवळील नविन झालेल्या रस्त्यावर देऊळगांव नगरपरिषदेने अवैध पध्दतीने केलेले भूखंड वाटप

**(३५) * ५५१६४ डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) शहरातील बसस्थानकाजवळील चौंडेश्वरी हॉटेल ते अजिंठा गेस्ट हाऊस या नविन झालेल्या रस्त्यावर देऊळगांव नगरपरिषदेने नियमबाह्यरित्या भूखंडांचे वाटप करुन त्यावर अनधिकृतरित्या दुकानांचे बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात येऊन नियमबाह्यरित्या वाटप केलेल्या जागा व त्यावरील अनधिकृत दुकाने हटविण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत अहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) यासंदर्भात मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे दिनांक १३/९/२०२२ रोजी पत्राद्वारे मागणी केल्याचे दिसून येत आहे.
(३) देऊळगांव राजा नगरपरिषदेने शहरातील बसस्थानकाजवळील चौंडेश्वरी हॉटेल ते अजिंठा गेस्ट हाऊस या ठिकाणच्या नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेवर अंदाजे १०X१४ चे १८ भूखंड तयार करुन ते ३ वर्षाच्या कालावधीसाठी वितरीत करण्याकरीता दिनांक २८/९/२०२२ रोजी प्रशासकीय ठराव घेऊन तसेच जाहिरात देऊन दिनांक १७/१०/२०२२ रोजी लिलाव केला होता.

यासाठी ठरावानुसार प्रतिमहा भाडे रुपये ५००/- व अनामत रक्कम रुपये २०,०००/- इतकी निश्चित करण्यात आली.

दरम्यान यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी तसेच मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे भूखंड वाटपाची कार्यवाही योग्यरित्या झाली नाही, अशी तक्रार केली असून याबाबत नियमानुसार प्रक्रिया करावी, अशी मागणी केली आहे.

सदर कारणावरुन प्रशासक यांनी जागा वाटपाची कार्यवाही तात्काळ रद्द करण्याबाबत मुख्याधिकारी, नगरपरिषद देऊळगांव राजा यांना निर्देश दिले असून सदर बाब मुख्याधिकारी यांनी संबंधित लिलावधारकांना दिनांक २२/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ६२२ कोटी लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच थेट जलस्त्रोतात सोडण्यात येत असल्याबाबत

**(३६) * ५२७७७ श्री. रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नदीकाठची गावे आणि शहरांमधून दररोज निर्माण होणाऱ्या ९७५ कोटी ८० लाख लिटर सांडपाण्यापैकी केवळ ३६.२% म्हणजे ३५३ कोटी २० लाख लिटर पाण्यावर प्रक्रिया होत असून उर्वरित पाणी प्रक्रिया न करताच सोडण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रक्रिया न करता मोठ्या प्रमाणात सांडपाणी थेट नद्यांमध्ये सोडल्यामुळे जलजीवांसह नागरिकांच्या आरोग्यावर याचे घातक परिणाम होत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी राज्यातील सर्व गावे व शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक करण्याबाबत तसेच सांडपाणी थेट जलस्त्रोतात सोडण्यास निर्बंध घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये एकुण सांडपाण्याची निर्मिती सुमारे ८१९२ दशलक्ष लिटर असुन त्यापैकी सुमारे २७२८ दशलक्ष लिटर सांडपाणी नदीकाठावरील स्थानिक स्वराज्य संस्थामधुन निर्माण होते. त्यापैकी सुमारे २०२४ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते.

(२) हे अंशत: खरे आहे.
(३) जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३ (अ) व पर्यावरण (सुरक्षा) कायदा, १९८६ यामधील तरतूदींनूसार सांडपाण्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक केले आहे. त्यानूसार दोषी आढळणाऱ्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांविरुध्द जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३ (अ) व पर्यावरण (सुरक्षा) कायदा, १९८६ अंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भामा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) धरण प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना मोबदला देवून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३७) * ५५०९२ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भामा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) धरण प्रकल्पासाठी कुदळवाडी (देवतारणे), कासारी, वाघू, साबळेवाडी, शुवे, पराळे, गवारवाडी, रौंधळवाडी, अनावळे, वाकी अशा एकूण २३ गावे, वाड्या-वस्त्यांसह १ हजार ४१४ बाधित खातेदारांच्या जवळपास २ हजार हेक्टर जमिनी संपादित केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला मिळाला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी तक्रार/निवेदने देऊनही सदर प्रकल्पग्रस्तांना मोबदला न मिळण्यामागची कारणे काय आहेत ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भामा आसखेड धरण प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना मोबदला देवून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
भामा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) धरणप्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी खेड तालुक्यातील २३ गावांमधील एकूण १४८३ जमिनींचे संपादन करण्यात आलेले आहे. सदर संपादनासाठी एकूण रूपये २१,६२,७५,५५६/- (रूपये एकवीस कोटी बासष्ट लाख पंच्याहत्तर हजार पाचशे छपन्न फक्त) इतकी जमिनीच्या मोबदल्याची रक्कम खातेदारांना वाटप करण्यात आलेली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) जमिनीच्या मोबदल्याबाबत प्रश्न उद्भवत नाही. पर्यायी जमिनीच्या ऐवजी खास बाब म्हणून देण्यात येत असलेली रक्कम एकूण ८२३ प्रकल्पग्रस्तांना रू.९३,२३,९५,९२६/- (रूपये त्र्याण्णव कोटी तेवीस लक्ष पंच्याण्णव हजार नऊशे सव्वीस फक्त) एवढी रक्कम वाटप केली असून इतर पात्र प्रकल्पग्रस्तांकडून पर्यायी जमीन किंवा त्या ऐवजी खास बाब अनुदान वाटपासाठी प्राप्त होत असलेल्या अर्जांवर नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**मुंबई शहर व उपनगराला पाणीपुरवठा करणाऱ्या जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलण्याबाबत**

**(३८) * ४९६८५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात पाणीपुरवठा करणाऱ्या अंतर्गत जलवाहिन्या जीर्ण होऊन होणाऱ्या गळतीमुळे दररोज तब्बल १७० दशलक्ष लिटर पेक्षा जास्त पाणी वाया जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने जलवाहिन्या बदलण्यासाठी / दुरुस्तीसाठी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता ५६१ कोटी रुपयांची तरतूद केली होती, मात्र त्यापैकी ५० टक्के पेक्षा कमी निधी देखील खर्च करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईस पाणीपुरवठा करणाऱ्या तलावात मुबलक पाणी साठा उपलब्ध असतानाही नादुरुस्त जलवाहिन्यांमुळे मुंबईकरांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे
(४) असल्यास, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जीर्ण झालेल्या जलवाहिन्या तातडीने बदलण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबई शहर व उपनगरांमध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या जुन्या जलवाहिन्या जीर्ण झालेल्या असल्यास किंवा सतत गळती होत असल्यास सदर जलवाहिन्यांची दुरुस्ती किंवा बदलण्याची कामे आवश्यकतेनुसार करण्यात येतात. तसेच, गळतीसंबंधी कुठलीही तक्रार प्राप्त होताच त्याठिकाणी तात्काळ दुरुस्ती केली जाते व गळती थांबवली जाते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) सन २०२१-२२ या वर्षाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने जलवाहिन्या सुधारण्यासाठी रु. ३५१.३७ कोटी इतक्या रकमेची तरतूद केली होती, त्यापैकी रु. ३२३.२२ कोटी (९२ टक्के) इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नादुरुस्त (जुन्या व जीर्ण झालेल्या) जलवाहिन्या बदलण्याची कार्यवाही नियमितपणे सुरु असते.

तथापि, मोठी गळती, उदंचन केंद्रातील बिघाड वा वीज पुरवठा खंडीत होणे या कारणास्तव लोकांना काही वेळेस पाणी टंचाईस तोंड द्यावे लागते. यास्तव अशा समस्यांचे त्वरीत निराकरण करुन पाणी पुरवठा सुरळीत ठेवला जातो. तसेच काही वेळेस नव्याने टाकण्यात आलेल्या जलवाहिन्या कार्यान्वित करण्यासाठी सुध्दा काही भागाचा पाणी पुरवठा नियंत्रित करावा लागतो किंवा काही काळाकरिता बंद ठेवावा लागतो. अशा वेळेस काही भागात पाणी टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण होते. परंतु ही परिस्थिती मर्यादित कालावधीसाठीच असते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) मुंबई शहर व उपनगरमध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या जलवाहिन्या जीर्ण झाल्या असल्यास किंवा सतत गळती होत असल्यास सदर जलवाहिन्यांची दुरुस्ती किंवा त्या बदलण्याची कामे आवश्यकतेनुसार महानगरपालिकेमार्फत नियमितपणे करण्यात येतात. तसेच, गळतीबाबत तक्रार प्राप्त होताच त्या ठिकाणी दुरुस्ती करुन गळती थांबवली जाते. जलवाहीनी बदलण्याकरीता दरवर्षी आवश्यकतेनुसार निधीची तरतूद करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर सुधार प्रन्यासने ट्रान्सपोर्ट प्लाझाच्या जागेवर आरक्षण असताना अन्य प्रकल्प उभारल्याबाबत

**(३९) * ५४६८८ श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर सुधार प्रन्यासने ट्रान्सपोर्ट प्लाझाच्या जागेवर आरक्षण असताना मॉल तयार करून बी.ओ.टी. तत्वावर लिलावाद्वारे ५० कोटी रेडीरेकनर दर असताना २५.६१ कोटी रक्कम दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सबलीजचे नियम नसताना सबलीज करून देणे, नागनदीच्या भिंतीवर पिलर उभे करणे व अन्य विषयाबाबत चौकशी करण्याकरिता शासनाने वारंवार पत्राद्वारे कळवूनही कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर सुधार प्रन्यासने शासनाला दिशाभूल करणारे उत्तर दिल्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा आय.ए.एस. अधिकाऱ्यांमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मौजा नागपूर खसरा क्रमांक ५७६, ३२४/१ भाग ही जागा शासनाने दि.१०.०९.२००१ अन्वये मंजूर केलेल्या नागपूर शहराच्या विकास आराखडयात एस.टी. स्टँड करिता (Reservation No. ME-९४) आरक्षित ठेवण्यात आली आहे. सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हे आहे. ट्रान्सपोर्ट प्लाझा या प्रकल्पाअंर्तगत बस टर्मिनल जमिनीची किंमत सन २०१४ च्या शिघ्र सिद्धगणकाप्रमाणे अंदाजे रु.२५.६१ कोटी होती.
(२), (३) व (४) शासनाची व परिवहन आयुक्तांची परवानगी न घेता एस.टी. बस स्टँडचे आरक्षण असताना बी.ओ.टी. वर दवाखाना, हॉटेल्स, जिम, लग्न समारोह हॉल, नागनदीवर पिल्लरचे बांधकाम करणे व अन्य प्रोजेक्ट तयार करुन नियमाचे उल्लंघन झाले असल्यामुळे उच्चस्तरीय चौकशी करुन कारवाई करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी शासनास दिलेल्या निवेदनावर शासनाने दि.१२ जानेवारी, २०२२ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचा अहवाल अपेक्षिलेला आहे.

त्यानुषंगाने सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी दि.०४/०४/२०२२ रोजीचे पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. तद्नंतर प्रस्तुत प्रकरणी मा.श्री.कृष्णा खोपडे, विधानसभा सदस्य यांनी शासनास निवेदन दिले आहे. त्यानुषंगाने शासनाने दि.०३/१०/२०२२ रोजीचे पत्रान्वये सभापती, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडून अहवाल अपेक्षिलेला आहे.

शासनाचे दिनांक १२/०१/२०२२ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने सहसंचालक नगर रचना, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर, सहायक संचालक नगर रचना, नागपूर महानगरपालिका व सहायक आयुक्त, नेहरुनगर विभागीय कार्यालय नागपूर महानगरपालिका या त्रिसदस्यीय समीतीव्दारे विषयांकीत प्रकल्पाच्या बांधकामाचे चौकशी करण्यात आली होती. सदर चौकशीच्या अहवालात विकासकाने नागनदीच्या संरक्षण भिंतीवरील कुंपण भिंतीचे बांधकाम अनधिकृत केल्याचे दिसुन येत नाही, असे समितीने निरिक्षण व निष्कर्ष नोंदविले असल्याचे सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी दि.०९/१२/२०२२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मागासवर्गीय गृहनिर्माण सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत

**(४०) * ४९५३७ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत ठिकठिकाणी पुनर्विकास होत असून मागासवर्गीय गृहनिर्माण सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत शासनाने अद्याप धोरण ठरवले नसल्याने पुनर्विकास प्रलंबित असल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुनर्विकासाला परवानगी हवी असल्यास सामाजिक न्याय विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र सादर करण्याची अट म्हाडाने घातल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागसवर्गीय गृहनिर्माण सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याबाबतची म्हाडाने घातलेली अट रद्द करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दि.२६ जून, २००९ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकासाकरिता शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरू असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## मुंबईतील भेंडीबाजार परिसरातील जीर्ण इमारती पाडून विकासकाने बेकायदा प्रकल्प राबविल्याबाबत

**(४१) * ५४४४३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबईतील भेंडीबाजार येथील १६.५ एकर जागेतील २२० जीर्ण झालेल्या इमारती पाडून समुह पुनर्विकास योजनेअतंर्गत राबविण्यात येत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पात डी.सी.रुल व महानगरपालिका अधिनियमाचे उल्लंघन करुन अनियमितता व गैरव्यवहार केल्याप्रकरणी महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रकल्प राबविणाऱ्या सैफी बुऱ्हानी ट्रस्टला काम थांबविण्याची नोटीस दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पात महानगरपालिकेची जागा, ड्रेनेज स्ट्रॉम वॉटर, आदि महानगरपालिकेच्या अनेक पुरवठा सुविधा खंडीत करुन त्या जागांचा प्रकल्पात समावेश करून गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

सन २०२२ च्या पावसाळी अधिवेशनात विधी मंडळात घेतलेल्या निर्णयानुसार विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील नियम क्र. ३३(९) अंतर्गत सैफी बुऱ्हाणी ट्रस्टच्या सुरु असलेल्या भेंडीबाजार येथील समूह पुनर्विकास प्रकल्पाची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यामुळे सदर प्रकल्पाचे बांधकाम थांबविण्याची नोटीस देण्यात आली होती, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) सदर एसबीयुटी प्रकल्पाच्या चौकशीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत गठीत करण्यात आलेल्या समितीने, सदर प्रकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झाली नसल्याबाबतचा अहवाल दिला आहे. सबब सैफी बुऱ्हाणी ट्रस्टला बांधकाम थांबविण्याबाबत दिलेली नोटीस रद्द करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेत कचरा वाहतुकीच्या ठेक्याची मुदत सलग दोन वेळा वाढवून दिल्याबाबत

**(४२) * ४९६६६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेतील कचरा वाहतुकीच्या कंत्राटाची मुदत संपली असतांना नव्याने निविदा न काढता एका विशिष्ट कंपनीला सलग दोनदा मुदतवाढ देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घनकचरा विभागाने संबंधित ट्रान्सपोर्ट कंपनी विरोधात तक्रारी केल्या असतानाही याकडे दुर्लक्ष करून मुदतवाढ देताना कचरा वाहतुकीचे दर देखील दुप्पट करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या मुदतवाढीमुळे महानगरपालिकेला ३ कोटी ७५ लाखांचा भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

कचरा वाहतुकीच्या वाहनांची कमतरता व अत्यावश्यक सेवेतील कामकाज याचा विचार करून कचरा वाहतुकीच्या निविदेस स्थायी समिती यांच्या मान्यतेने २ वेळा मुदतवाढ देण्यात आलेली असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(२) व (३) महानगरपालिकेतील घनकचरा विभागाकडे संबंधित ट्रान्सपोर्ट कंपनी विरोधात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या ही वस्तुस्थिती आहे. या तक्रारींस अनुसरून महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली. चौकशीत प्राप्त तक्रारी गंभीर स्वरूपाच्या व कंपनीस काळ्या यादीत समाविष्ट करण्यासारख्या नसल्याने तसेच महानगरपालिकेस कचरा वाहतुकीच्या वाहनांची कमतरता व आवश्यकता पहाता या निविदेस स्थायी समितीच्या मान्यतेने कोणतीही दरवाढ न देता पूर्वीच्याच मान्य दराने मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे मुदतवाढ देताना कचरा वाहतुकीचे दर दुप्पट करण्यात आले नसल्याचे व महानगरपालिकेस भुर्दंड सोसावा लागला नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी (मुंबई) येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा रूग्णालयातील अनागोंदी कारभाराबाबत

**(४३) * ५२१६१ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी (मुंबई) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा रूग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन बंद असून, उपचारार्थ आवश्यक असणारी प्रतिजैविके, औषधे व वैद्यकीय साहित्याचा तुटवडा असल्याने रूग्णांना सदर बाबी बाहेरून खरेदी कराव्या लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त साधनसामुग्रीकरिता रूग्णालय प्रशासनास मिळणारा निधी अन्य ठिकाणी वळविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रूग्णालयातील साफसफाईचे कंत्राट कोणत्याही कराराविना मर्जीतील कंपन्यांना देण्यात आलेले असून या कंपन्यांमधील सफाई कर्मचारी सातत्याने गैरहजर राहत असल्याने रुग्णालयात अस्वच्छता असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डॉ.अनुजा नगरकर यांना रुग्णालयातील एन.आय.सी.यु. मध्ये काम करीत असल्याचे बेकायदेशीररित्या दाखवून वेतनही अदा करण्यात येत असून आवश्यकता नसताना या ठिकाणी दंतवैद्यकाची ५ पदे भरण्यात आली, मात्र दंतव्याधीचे रूग्ण नायर रूग्णालयात पाठविण्यात येणे, तसेच रुग्णालयातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी खाजगी दवाखान्यात प्रॅक्टिस करणे अशा अनेक अनियमितता निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रुग्णालयातील अनागोंदी कारभाराबाबतचे सविस्तर निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच अतिरिक्त आयुक्त पश्चिम उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे , हे खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदरहू अनागोंदी कारभाराबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) जोगेश्वरी येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा रुग्णालयात सन २०१६ पासून १ सी.टी. स्कॅन मशीन कार्यरत आहे. तथापि, क्वचित प्रसंगी तांत्रिक कारणामुळे सदर मशीन बंद पडल्यास वार्षिक सर्वपरिरक्षण करारांतर्गत (CMC) कंत्राटदारामार्फत ती तात्काळ दुरुस्त करण्यात येते. त्यादरम्यान आलेल्या रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून सदर रुग्ण हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा रूग्णालयाशी संलग्नित असलेल्या कुपर रुग्णालयात पाठविण्याची व्यवस्था करण्यात येते.

माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये सदर रुग्णालयात प्रतिजैविके व औषधे यांचा तुटवडा होता ही बाब खरी आहे. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नजीकच्या महापालिका रुग्णालयातून तात्पुरता स्वरुपात औषधे उपलब्ध करुन गरज भागविण्यात आली. तसेच, पुअर बॉक्स फंड/स्थानिक पातळीवर खरेदी करुन तसे प्रयोजन करण्यात आले होते.

सद्य:स्थितीत सदर रुग्णालयात प्रतिजैविके व औषधांचा तुटवडा नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर रुग्णालयातील साफसफाईचे कंत्राट बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत सन २०१८ पासनू पुढील ३ वर्षांकरिता मे. सिगमा टेकइन्फ्रा सोल्युशन इंडिया प्रा.लि. या कंपनीला देण्यात आले असून, सदर कंपनीमार्फत करण्यात येत असलेल्या रुग्णालयाच्या स्वच्छतेची पाहणी करण्यासाठी रुग्णालय स्तरावर "समय लेखकाची" नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा रुग्णालयातील एन.आय.सी.यु. विभाग माहे जानेवारी २०२२ पासून पुढील २ वर्षांकरिता सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून मे. जीवनज्योत चॅरिटेबल ट्रस्ट या कंपनीमार्फत चालविला जात असून तेथील डॉक्टरांची नियुक्ती व वेतन सदर कंपनीमार्फत केले जाते.

सदर रुग्णालयाच्या एन.आय.सी.यु. विभागात डॉ. अनुजा नगरकर यांना सदर कंपनीमार्फत एक दिवसाकरिता नियुक्त करण्यात आल्याचे हजेरीपटावरुन निदर्शनास आले आहे.

सदर रुग्णालयात दंतवैद्यकाची ३ पदे मंजूर आहेत. तथापि, सदर रुग्णालय हे पश्चिम द्रुतगती मार्गावरील एकमेव महापालिका ट्रामा रुग्णालय असल्यामुळे, अपघाती रुग्णांचे वाढते प्रमाण पाहता सदर रुग्णालयात दंतवैद्यकाचे एक अतिरिक्त पद कंत्राटी पध्दतीने भरण्यात आले आहे.

सदर रुग्णालयातील गंभीर अपघाती स्वरुपाच्या दंतव्याधीच्या रुग्णांना मोठ्या शस्त्रक्रियेकरिता नायर दंत महाविद्यालयात पाठविण्यात येते.

सदर रुग्णालयातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी खाजगी दवाखान्यात प्रॅक्टिस करत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) व (६) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सदर निवेदनाच्या अनुषंगाने त्यांचेसमवेत दिनांक १४.११.२०२२ रोजी बैठक घेण्यात आली असून, त्यांना सदर बैठकीचे इतिवृत्त दिनांक १६.१२.२०२२ रोजी पाठविण्यात आले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विजयदुर्ग (जि.सिंधुदूर्ग) येथील समुद्रात बुडालेल्या पार्थ या तेलवाहतूक जहाजातून समुद्रात झालेली तेलगळती

**(४४) * ४९८३९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विजयदुर्ग (जि.सिंधुदूर्ग) येथील समुद्रात बुडालेल्या पार्थ या तेल वाहतूक जहाजातून समुद्रात तेलगळती सुरू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी समुद्रात तेलगळती सुरु झाल्यामुळे मच्छीमारी व्यवसायाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू तेल प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अशंत: खरे आहे.

(२) मत्स्य व्यवसाय विभागाकडून प्राप्त अहवालानुसार मच्छीमारी व्यवसायाला धोका निर्माण झालेला नाही.

(३) तेल गळती झाल्यास पुर्वतयारी म्हणून महसूल विभागामार्फत दि.२१ सप्टेंबर, २०२२ रोजी देवगड तहसिल कार्यालय येथे व दि. २३.०९.२०२२ रोजी चिवला बिच, मालवण येथे तटरक्षक दल, रत्नागिरी यांच्या मार्गदर्शनाखाली रंगीत तालमीचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर प्रशिक्षणादरम्यान मासेमार बांधव उपस्थित होते तसेच सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचना दि. २३.०९.२०२२ च्या पत्राने सर्व मासेमार बांधव यांना कळविण्यात आले. संभाव्य तेल गळतीच्या अनुषंगाने आवश्यक खबरदारी घेण्यासाठी सर्व मासेमार बांधव/नौका मालक/खलाशी वर्ग यांना मत्स्य सहकारी संस्था मार्फत विभागाकडून सतर्क करण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीवरील पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४५) * ५२८७० श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील उल्हासनगर रेल्वे स्टेशनसमोर असणाऱ्या वालधुनी नदीवरील पुल अत्यंत धोकादायक झाल्याने सदर पुल तोडून त्याची पुनर्बांधणी करण्याकरिता रु.४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्यानंतर ९ महिन्यांचा कालावधी उलटूनही नविन पुलाचे काम सुरु झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पूलाअभावी नागरिकांची गैरसाय होत असून अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन सदरहू पुलाचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) उल्हासनगर रेल्वे स्टेशनसमोर असणाऱ्या वालधुनी नदीवरील जीर्ण झालेला पूल अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याने कोणतीही दुर्घटना घडू नये याकरिता सदर पूल माहे जून, २०२२ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पूर्णपणे निष्कासित करण्यात आला.

सदर पुलाच्या बांधकामाकरिता निविदा प्रक्रिया करुन मे. झा.पी. ॲण्ड कंपनी यांचे नावे दिनांक ३०.०३.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

सदर निविदा ई.पी.सी. पध्दतीची असल्याने पुलाच्या बांधकामाचे प्राकलन, नकाशे, आराखडे संबंधित एजन्सीमार्फत तयार करण्यात येतात. सदर बांधकामाचे नकाशे, आराखड्यांना इंजिनिअरींग कॉलेज, पुणे यांची मान्यता होऊन ते दिनांक २७.०७.२०२२ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त झाले.

सन २०२२ मध्ये ऑक्टोबर महिन्याच्या अखेरपर्यंत पाऊस सुरु असल्याने व कामाच्या ठिकाणी पाणी पुरवठा विभागाच्या जलवाहिन्या असल्याने सदर जलवाहिन्या स्थलांतरणाची कार्यवाही पाणी पुरवठा विभागामार्फत सुरु आहे. या कारणांमुळे वालधुनी नदीवरील पुलाच्या बांधकामास उशीर झाला, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) नागरिकांची गैरसोय होऊ नये याकरिता सदर अस्तित्वातील पूल तोडण्यापूर्वी पर्यायी रहदारी व्यवस्था चांदीबाई कॉलेज समोरील पुलावरुन सुरळीत करण्यात आली आहे, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) पाणी पुरवठा विभागाच्या जलवाहिन्या स्थलांतरीत झाल्यानंतर सदर पुलाचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.